केडगाव, अहिल्यानगरमध्ये
प्लॉट हवाय? प्लॉट विकायचा?
घर हवंय? घर विकायचंय?
जमीन हवी ? जमीन विकायचीय?
SHIVAM PROPERTIES
* ३० वर्षांची विश्वसनीय सेवा *
शिवम प्रॉपर्टीज
संपर्क - 9822116347, 9881620700

RNI No. 6153/57

समाचार
SAMACHAR

Volume - 75 | Issue- 77 | Marathi Daily | Friday 20/11/2026 | Pages - 6 | Price- Rs. 3

उपवासाच्या सर्व प्रकारच्या पदार्थांसाठी ग्राहकांची प्रथम पसंती...
सर्वोत्कृष्ट प्रतिचा, स्वच्छ व चविष्ट
VEGETARIAN
राजमोती साबुदाना
एक्स्ट्रॉ सुपरफाइन साबुदाना
सर्वत्र उपलब्ध
1 Kg | 500 gm | 250 gm • इन्स्टंट साबुदाना सुद्धा उपलब्ध !

92.5% शुध्द चांदीमधील अप्रतिम दागिन्यांची असंख्य व्हरायटी
लेडिज अंगठी | फॅन्सी टॉप व रिंगा | लेडिज ब्रासलेट | फॅन्सी गंठन व नेकलेस | कडली | घड्याळ
साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर
9272422001/02
92.50 शुध्द चांदीपासुन बनविलेले खास आपल्या लाडक्या लहान बालगोपाळांसाठी
चांदीमधील कार्टुन ग्लास, कडली, फुलपात्र, चमचा, ताट, वाटी, बाटली, कडे, पैजण, वाळे, तोडे, मग आणि बरचं काही..

उठाठेव
- विवेक मेहेत्रे



बिरजू... सगळ्या गिऱ्हाईकांना कल्पना देऊन ठेव की आम्हालाही दुधाचे भाव दिवसाआड कमी - जास्त करावे लागतील!

निवडक

राजस्थानातील निवडणुकांत
भाजपाला धक्का



जयपूर, दि.२०- राजस्थानमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये काँग्रेस आघाडीवर दिसत आहे. ४१९ पंचायत समित्यांपैकी २०१ जागांचे कल हाती आले आहेत. १०२ पंचायत समित्यांमध्ये आघाडी घेत काँग्रेस सर्वात पुढे आहे. त्याखालोखाल भाजप आहे. भाजपने ७१ समित्यांमध्ये आघाडी मिळाली आहे, तर अपक्ष आणि इतर २८ जागांवर आघाडीवर आहे. याशिवाय, जिल्हा परिषद निवडणुकीत मात्र भाजप आणि काँग्रेस जवळपास बरोबरीवर आहेत. जयपूरमध्ये सत्ताधारी भारतीय जनता पक्षाला मोठा धक्का बसला आहे. जिल्हा परिषदेच्या ५७ पैकी ७ जागांचे निकाल जाहीर झाले आहेत. यापैकी काँग्रेसने ४ जागांवर विजय मिळवला आहे. भाजपला केवळ एकच जागा मिळवता आली आहे. मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्या सांगानेर विधानसभा मतदारसंघात हनुमान बेनीवाल यांचा पक्ष सर्वाधिक ५ जागा जिंकत आघाडीवर आहे. येथे भाजपने दोन जागांवर विजय मिळवला असून, काँग्रेसने एक जागा जिंकली आहे.

जिल्ह्यावर दुष्काळाचे संकट गडद
२७५ गावे तहानलेली; चारा छावण्यांची प्रतीक्षा!

समाचार/नगर-दि.२०

यंदाच्या पावसाळ्यात पावसाने दडी मारल्यामुळे अहिल्या नगर जिल्ह्यात तीव्र दुष्काळाचे भीषण संकट कोसळले आहे. नोव्हेंबर महिन्यातच जिल्ह्यातील भूजल पातळीने तळ गाठला असून, गावोगावच्या विहिरी, बोअरवेल आणि पाझर तलाव कोरडेठाक पडले आहेत. जिल्ह्यातील २७५ गावे आणि १,५७९ वाड्यांमधील तब्बल सव्वापाच लाखांहून अधिक नागरिकांची तहान सध्या २९९ टँकरवर अवलंबून आहे. एकीकडे पिण्याच्या पाण्यासाठी हंडाभर पाण्यासाठी दाहीदिशा भटकंती सुरू असताना, दुसरीकडे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाल्यामुळे जिल्ह्यातील दुग्धव्यवसाय आणि पशुधन संकटात सापडले आहे.



पाथर्डी, कर्जत, शेवगाव, जामखेड आणि पारनेर या तालुक्यांमध्ये पाणीटंचाईने रौद्र रूप धारण केले आहे. एकट्या पाथर्डी तालुक्यात सर्वाधिक १०० टँकर धावत असून, शेवगाव (४१), कर्जत (३९), अहिल्या नगर (३५) आणि जामखेड (३१) तालुक्यांतही टँकरची संख्या झपाट्याने वाढत आहे. केवळ ग्रामीण भागच नव्हे, तर पाथर्डी, शेवगाव, कर्जत आणि पारनेर या शहरांनाही आता टँकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ प्रशासनावर आली आहे. पाण्यासोबतच जिल्ह्यात जनावरांच्या चाऱ्याची टंचाई अतिशय गंभीर बनली आहे.

अहिल्या नगर, जामखेड, पाथर्डी आणि पारनेर या चार तालुक्यांत चारा टंचाई आहे. संगमनेर तालुक्यातही कमी प्रमाणात चारा शिल्लक आहे. रब्बी हंगामातील पेरण्या पाण्याअभावी रखडल्याने नवीन चारा उपलब्ध होण्याची शक्यता धूसर झाली आहे. प्रशासनाने संभाव्य टंचाईवर मात करण्यासाठी ४७० ते ४७५ कोटी रुपयांचा कृती आराखडा तयार केला असून, दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उपाययोजा सुरू केल्या आहेत.

लग्नसराईसाठी ग्राहकांना मोठा दिलासा
सोने १ लाख २१ हजारांच्या खाली तर चांदीही दीड लाखांच्या आत!



मुंबई, दि.२०- गेल्या काही दिवसांपासून सोने - चांदीच्या भावातील घसरण आजही चालूच राहिली असून सोन्याचे १० ग्रॅमचे दर १ लाख २१ हजारांवर तर चांदीचे दर किलोमागे दीड लाखांच्या खाली आले आहेत. गेल्या दहा महिन्याचे सोन्याचे भाव तब्बल ७० हजारांनी उतरले आहेत. त्यामुळे तुळशी विवाहानंतर सुरू होणाऱ्या लग्नसराईसाठी ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. दरम्यान सोने चांदीच्या किमती मोठ्या प्रमाणात घसरण्यामागे अमेरिकेतील आर्थिक घडामोडींचे कारण असल्याचे सांगितले जात आहे.

गेल्या वर्षी दरवाढीचं विक्रमी उच्चांक करणाऱ्या सोने चांदी या दोन्ही मौल्यवान धातूंचे दर आता झपाट्याने खाली येत आहेत. आज शुक्रवारी भारतीय बाजारातील सोने चांदीच्या भावात मोठी घसरण झाल्याचे दिसून आले. सोन्याचे दर १० ग्रॅममागे १ लाख २१ हजारांवर आले आहेत तर चांदीचे दर किलोमागे दीड लाखांच्या खाली उतरले आहेत. आता तुळशी विवाहानंतर लग्नसराई सुरू होत असल्याने ग्राहकांसाठी हा मोठा दिलासा मानला जात आहे. सोने चांदी भावातील मोठ्या घसरणीमुळे गुंतवणूकदारांमध्ये मात्र चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शुक्रवारी सोन्याच्या भावात ५ टक्क्यांची

(पान ३ वर)

राज्यव्यापी आंदोलन करण्याचा इशारा
एफडीएच्या कारवाईविरोधात औषध विक्रेते आक्रमक

समाचार/नगर-दि.२०

अन्न व औषध प्रशासनाकडून राज्यातील औषध विक्रेत्यांविरुद्ध किरकोळ स्वरूपाच्या त्रुटी आणि छोट्या चुकांवरही कठोर कारवाई केली जात असल्याचा आरोप करत औषध विक्रेत्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. प्रशासनाच्या या कथित अन्यायकारक आणि जाचक कारवाईविरोधात राज्यातील औषध विक्रेत्यांची संघटना आंदोलनाच्या तयारीत असून, अहिल्यानगर जिल्हा केमिस्ट असोसिएशननेही या आंदोलनाला पाठिंबा देत आंदोलनात्मक भूमिका घेण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

औषध विक्रेत्यांविरुद्ध अन्न व औषध प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या कारवाईविरोधात दाद मागण्यासाठी यापूर्वी ९० दिवसांचा कालावधी उपलब्ध होता. मात्र, हा कालावधी शून्य दिवसांवर आणण्यात आल्याने औषध विक्रेत्यांना अपील करण्याची संधीच नाकारली जात असल्याची संघटनेची तक्रार आहे. यामुळे नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वालाच हरताळ फासला जात असून, औषध विक्रेत्यांना आपली बाजू मांडण्याची पुरेशी संधी मिळत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. किरकोळ स्वरूपाच्या त्रुटींसाठी औषध विक्रेत्यांवर कठोर कारवाई केली जात असताना, त्यापेक्षाही गंभीर स्वरूपाचे नियमभंग करणारे काही डॉक्टर तसेच ऑनलाइन औषध विक्रेत्यांकडे प्रशासनाकडून अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याचा सवाल संघटनेने उपस्थित केला आहे. कारवाई करताना सर्वांसाठी समान निकष असावेत, तसेच औषध विक्रेत्यांनाही आपली बाजू मांडण्याची आणि न्याय मिळविण्याची संधी मिळावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.औषध विक्रेत्यांच्या मागण्यांबाबत योग्य वेळी सकारात्मक निर्णय न झाल्यास आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याचा इशारा दिला आहे. त्याचबरोबर कायदेशीर मार्गानेही आपल्या न्याय्य हक्कांसाठी लढा देण्याचा निर्धार संघटनेचे राज्य अध्यक्ष जगन्नाथ शिंदे व सचिव अनिल नावंदर यांनी व्यक्त केला आहे. याबाबत

(पान ३ वर)

जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकरी हितास प्राधान्य देणार
ऊसदराबाबत समन्वयातून मार्ग काढण्यासाठी प्रयत्नशील-डॉ. विखे

समाचार/नगर-दि.२०

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातून तातडीने लोकप्रिय निर्णय घेण्यापेक्षा बँकेची आर्थिक स्थिती समजून घेऊन शेतकरी केंद्रस्थानी ठेवून निर्णय घेतले जातील, असे बँकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. सुजय विखे यांनी स्पष्ट केले आहे. ऊसदराबाबत बोलताना शेतकऱ्यांच्या ऊसाला योग्य भाव मिळावा त्याबरोबरच साखर कारखान्यांचे आर्थिक गणित बिघडू नये यासाठी समन्वयातून मार्ग काढण्याचा प्रयत्न असल्याचेही डॉ. विखे यांनी सांगितले.



अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे डॉ विखे यांनी काल स्वीकारली. त्यावेळी माध्यमांशी बोलताना पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी बँकेच्या आगामी कामकाजाची दिशा स्पष्ट केली. जिल्हा बँकेत शेतकऱ्यांचे हित केंद्रस्थानी ठेवून निर्णय घेतले जातील बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अधिक सक्षम सुविधा आणि योजनांचा लाभ मिळवून देण्यावर आपला भर राहणार आहे. अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर तातडीने लोकप्रिय निर्णय घेण्यापेक्षा सर्वप्रथम बँकेची आर्थिक स्थिती समजून घेतल्यानंतर शेतकऱ्यांच्या हिताचे आणि बँकेच्या प्रगतीला पूरक ठरणारे निर्णय घेतले जातील, असेही ते म्हणाले.

ऊसदराच्या प्रश्नावर बोलताना त्यांनी शेतकरी संघटनेच्या मागण्या आणि भूमिका समजून घेतल्याचे सांगितले. शेतकऱ्यांच्या उसाला योग्य दर मिळावा, त्याचवेळी सहकारी साखर कारखान्यांचे आर्थिक गणितही बिघडू नये, यासाठी समन्वयातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल. आगामी काळातील दुष्काळी परिस्थिती आणि कारखान्यांसमोरील संभाव्य अडचणी लक्षात घेऊन सर्व घटकांच्या हिताचा विचार करून निर्णय घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. जिल्हा सहकारी बँक ही ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक व्यवहारांचा महत्त्वाचा आधार आहे.

(पान ३ वर)

कुकाणा येथे १२ किलो गांजा पकडला

समाचार/नगर-दि.२०

कुकाणा (ता.नेवासा) येथे घरातून गांजाची विक्री करणारा स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात अकडला. या कारवाईत ११.१८२ किलो गांजाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि हरिष भोये व पोलीस अंमलदार बाळासाहेब नागरगोजे, रिचर्ड गायकवाड, विकास साळवे, अशोक लिपणे, शामसुंदर जाधव, मनोज साखरे ,नंदिनी झिने यांच्या पथकाने ही कारवाई केली. पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, शाहमद मेहबुब शेख (रा.मुलानीवाडा, कुकाणा, ता.नेवासा) याच्या घरामध्ये गांजा असून तो त्याची विक्री करत आहे. पथकाने मिळालेल्या माहितीवरून शाहमद मेहबुब शेख याच्या राहत्या घरी जाऊन पंचासमक्ष घराची पाहणी केली.घरामध्ये गांजा मिळून आल्याने शाहमद मेहबुब शेख (वय ४८, रा.मुलाणीवाडा, कुकाणा, ता.नेवासा)




(पान ३ वर)

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या राज्यस्तरीय समितीवर प्रा. बेरड

समाचार/नगर-दि.२०

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या राज्यस्तरीय समितीवर अशासकीय सदस्य म्हणून भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष प्रा भानुदास बेरड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान - टप्पा क्र. १ या अभियानाची अंमलबजावणी अधिक प्रभावी, लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्याच्या दृष्टीने दहा अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्त्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केल्या आहेत. त्यामध्ये अहिल्यानगर भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष व प्रदेश कार्यकारणी सदस्य प्रा. भानुदास बेरड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये संजय कौडगे (नांदेड), अरविंद पाटील निलंगेकर (निलंगा जि. लातूर), नितीनकुमार भुतडा (जुनी गुजरी जि. यवतमाळ), संजय गाते (पुलगाव जि. वर्धा), वासुदेव काळे (पाटस रोड जि. पुणे), जगदीश मुळीक (पुणे), प्रकाश निकम (मुखडा जि. पालघर), परशुराम ढेकणे (रत्नागिरी), प्रा. भानुदास बेरड (अहिल्यानगर) आणि बबनराव चौधरी (धुळे) यांचा समावेश आहे. या नियुक्तीमुळे प्रा. भानुदास बेरड यांचे जिल्ह्यात सर्वत्र अभिनंदन होत आहे.



अकवान चक्रीवादळामुळे ८ राज्यात पावसाचा इशारा
महाराष्ट्रातील काही भागात पावसाचे संकेत

समाचार/मुंबई-दि.२०

अकवान चक्रीवादळामुळे ८ राज्यांमध्ये पुढील चार आठवड्यांत पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तविली आहे. ओडिशा, पश्चिम बंगाल, दक्षिण भारत आणि महाराष्ट्रातील काही भागांत पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, १९ नोव्हेंबर ते १७ डिसेंबर या कालावधीत देशाच्या विविध भागांत पावसाचे चित्र पाहायला मिळू शकते. तर दुसरीकडे उत्तर भारतात थंडीसह दाट धुक्याचे संकट वाढले आहे.



बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले अकवान हे चक्रीवादळ गुरुवारी रात्री अधिक शक्तिशाली झाले आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, अकवान हे चक्रीवादळ आज (२० नोव्हेंबर) दुपारी उत्तर आंध्र प्रदेश आणि दक्षिण ओडिशाच्या किनारपट्टीवर म्हणजे गंजाम जिल्ह्यातील गोपाळपूरजवळ धडकण्याची शक्यता आहे.भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, अकवान हे चक्रीवादळ पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरातून ताशी १९ किमी वेगाने उत्तर-वायव्यकडे सरकत आहे. गुरुवारी रात्री ११:३० वाजता हे वादळ आंध्र प्रदेशातील कलिंगपट्टणमपासून आग्नेयेकडे १७० किमी आणि विशाखापट्टणमपासून पूर्व-आग्नेयेकडे २०० किमी आणि ओडिशातील गोपाळपूरपासून दक्षिणेकडे २४० किमी अंतरावर होते. तसेच हे वादळ किनारपट्टीवर धडकताना वाऱ्याचा वेग ताशी ७० ते ८० किमी असू शकतो, तर काही ठिकाणी हा वेग ताशी ९० किमीपर्यंत असण्याची शक्यता आहे.

विशाखापट्टणम किनारपट्टीवर २० ते ३० किमी प्रतितास वेगाने वारे वाहत असून समुद्र खवळलेला आहे. विशाखापट्टणमवरील चक्रीवादळाचा धोका टळला असला, तरी आज उत्तर आंध्र प्रदेशमध्ये पावसाची शक्यता आहे.ओडिशा आणि आंध्र प्रदेशमध्ये अकवान चक्रीवादळ आज धडकणार असल्याची माहिती आहे. या चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर ओडिशा आणि आंध्र प्रदेशमध्ये अलर्ट जारी करण्यात आलेला आहे. या चक्रीवादळाचा परिणाम आंध्र प्रदेश, ओडिशामध्ये होणार असून तिथे काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. यामुळे महाराष्ट्रातही काही भागांत पावसाची शक्यता आहे.

संपादकीय

सामान्यांच्या अधिकारांना बळ देणारा निवाडा

कलम २२(२) ची तरतूद स्पष्टपणे सांगते, की कोणत्याही व्यक्तीला अटक केल्यानंतर प्रवासाचा आवश्यक वेळ वगळता २४ तासांच्या आत जवळच्या दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करणे बंधनकारक आहे; परंतु स्वातंत्र्यानंतरच्या सात दशकांमध्ये पोलिस आणि तपास यंत्रणांकडून या अत्यंत महत्त्वाच्या घटनात्मक संरक्षणाची पायमल्ली हा आपल्या न्यायव्यवस्थेचा एक अत्यंत काळा आणि अस्वस्थ करणारा अध्याय राहिला आहे. 'ताब्यात घेणे' आणि 'औपचारिक अटक' या दोन शब्दांमधील काल्पनिक भेद निर्माण करून तपास यंत्रणांनी नागरिकांच्या स्वातंत्र्याची सर्रास चेष्टा चालवली होती. एखाद्या व्यक्तीला संशयावरून किंवा चौकशीसाठी पोलिस ठाण्यात उचलून आणायचे, दोन-तीन दिवस बेकायदेशीरपणे डांबून ठेवायचे, अमानुष छळ करायचा आणि न्यायालयात हजर करण्याची वेळ येईल, तेव्हा आदल्या तासाभरात अटक केल्याचे दाखवून कागदपत्रे रंगवायची ही देशातील पोलिस ठाण्यांमधील नित्याची कार्यपद्धती बनली होती. मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निकालाने या प्रक्रियात्मक ढोंगावर जबर प्रहार केला. एका ताज्या निवाड्याप्रसंगी न्यायालयाने स्पष्ट केले आहे, की २४ तासांची मुदत ही पोलिसांनी कागदोपत्री नोंदवलेल्या अटकेच्या वेळेपासून नव्हे, तर ज्या क्षणी त्या व्यक्तीचे प्रत्यक्ष स्वातंत्र्य हिरावून घेतले गेले, म्हणजेच ज्या क्षणी त्याला ताब्यात घेतले गेले, त्या पहिल्या क्षणापासूनच सुरू होते. हा निकाल म्हणजे भारतीय नागरिकाला संविधानाने दिलेल्या वैयक्तिक स्वातंत्र्याची वेळेवर केलेली पुनर्स्थापना आहे.ताजा निकाल केवळ प्रक्रियात्मक सुधारणा नाही, तर मानवी सन्मान आणि जीविताच्या संरक्षणाची एक भक्कम भिंत आहे. या ऐतिहासिक निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने केवळ पोलिसांवर ताशेरे ओढून आपले कर्तव्य संपवले नाही, तर देशातील दंडाधिकाऱ्यांनाही त्यांच्या घटनात्मक कर्तव्याची कठोर जाणीव करून दिली आहे. आपल्या फौजदारी न्यायव्यवस्थेत दंडाधिकारी हा नागरिकाच्या मूलभूत हक्कांचा पहिला न्यायालयीन रक्षक असतो. दुर्दैवाने, गेल्या काही दशकांमध्ये कनिष्ठ न्यायालयांमधील ही प्रक्रिया केवळ एक यांत्रिक आणि औपचारिक सोपस्कार बनली होती. पोलिसांनी एखाद्या आरोपीला हजर केले की, पोलिसांनी तयार केलेल्या 'रिमांड ॲप्लिकेशन'वर आणि अटकेच्या वेळेवर डोळे झाकून विश्वास ठेवत दंडाधिकारी पुढील कोठडी मंजूर करत असत. सर्वोच्च न्यायालयाने आता दंडाधिकाऱ्यांना स्पष्ट ताकीद दिली आहे, की त्यांनी पोलिसांच्या कागदपत्रांवर आंधळेपणाने अवलंबून राहू नये. दंडाधिकाऱ्यांनी आरोपीला प्रत्यक्ष विचारणा करून, त्याला कधी, कुठून आणि कोणत्या वेळी ताब्यात घेण्यात आले, याची स्वतंत्र चौकशी केली पाहिजे. तसेच, आरोपीला प्रत्यक्ष ताब्यात घेतलेली वेळच दंडाधिकाऱ्यांनी अधिकृत न्यायालयीन नोंदीमध्ये नोंदवली पाहिजे. पोलिस ठाण्यातून न्यायालयात नेण्यासाठी लागणारा प्रवासाचा वाजवी कालावधी वगळता उर्वरित वेळेची अत्यंत बारकाईने तपासणी झाली पाहिजे. पोलिसांनी २४ तासांची मर्यादा ओलांडली असेल किंवा अटकेची खोटी वेळ दाखवून न्यायालयाची दिशाभूल केली असेल, तर दंडाधिकाऱ्यांनी केवळ आरोपीला कोठडी नाकारणेच नव्हे, तर संबंधित पोलिसांवर बेकायदेशीर डांबून ठेवल्याबद्दल तात्काळ कारवाईचे आदेश दिले पाहिजेत. कनिष्ठ न्यायालये अशा प्रकरणांमध्ये कठोर आणि संवेदनशील भूमिका घेत नाहीत, तोपर्यंत घटनात्मक संरक्षणाला जमिनीवर अर्थ प्राप्त होणार नाही. या निर्णयाच्या अनुषंगाने आणखी एका महत्त्वाच्या कायदेशीर उपायाचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे, तो म्हणजे 'हेबियस कॉर्पस' अर्थात 'बंदी प्रत्यक्षीकरण' याचिका. राज्यघटनेच्या कलम ३२ आणि २२६ अंतर्गत सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांना दिलेला हा अधिकार नागरिकांच्या स्वातंत्र्याचे अंतिम आणि सर्वोच्च कवच आहे. एखाद्या व्यक्तीला राज्याने किंवा त्याच्या यंत्रणेने बेकायदेशीरपणे ताब्यात घेतले असेल, तर 'त्या व्यक्तीला आमच्यासमोर हजर करा' असा थेट आदेश न्यायालय देऊ शकते; परंतु गेल्या काही वर्षांमध्ये 'हेबियस कॉर्पस' याचिकांची परिणामकारकता आणि त्यांच्या सुनावणीतील गतिमानता याबाबत सातत्याने चिंता व्यक्त केली जात आहे. जम्मू-काश्मीरमध्ये ऑगस्ट २०१९ मध्ये कलम ३७० रद्द केल्यानंतर लागू करण्यात आलेल्या निर्बंधांच्या काळात प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेला आव्हान देणाऱ्या दोन हजारांहून अधिक 'हेबियस कॉर्पस' याचिका दाखल झाल्या होत्या. यातील बहुतांश याचिकांवर महिनोन्महिने तर काहींवर वर्षांनंतरही निर्णय झाले नाहीत. अनेक प्रकरणांमध्ये तर व्यक्तीची नजरकैदेची मुदत संपल्यानंतर सुनावणी झाली. त्यामुळे याचिकेचा मूळ उद्देशच निरर्थक ठरला. समाजात गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवणे आणि कायदा-सुव्यवस्था राखणे हे राज्याचे प्राथमिक कर्तव्य आहे, यात तीळमात्र शंका नाही. अमली पदार्थांचे रॅकेट, दहशतवाद, संघटित गुन्हेगारी किंवा सायबर गुन्हे यांसारख्या आव्हानांचा सामना करताना तपास यंत्रणांना कठोर पावले उचलावी लागतात, हे वास्तव कोणीही नाकारू शकत नाही. गुन्हेगारांमध्ये कायद्याचा धाक असलाच पाहिजे आणि गुन्ह्यांचा छडा वेगाने लावलाच पाहिजे; परंतु गुन्हेगारीविरुद्धच्या या लढाईचा अर्थ पोलिसांनी कायद्याचे उल्लंघन करून 'सुपर-कॉप'ची भूमिका घ्यावी, असा मुळीच नाही. लोकशाहीमध्ये 'साध्य' जितके पवित्र असावे लागते, तितकीच 'साधने'ही शुद्ध असावी लागतात. गुन्हेगारी संपवण्याच्या नावाखाली राज्य स्वतःच कायद्याचे उल्लंघन करू लागले आणि नागरिकांचे मूलभूत हक्क पायदळी तुडवू लागले, तर राज्यसंस्था आणि गुन्हेगार यांच्यातील नैतिक फरकच संपुष्टात येतो. दुर्दैवाने आज देशातील अनेक भागांमध्ये हे घडत आहे. त्यावर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने समोर आलेला निवाडा महत्वपूर्ण आहे. पोलिसांतर्फे त्याची बूज राखली गेली म्हणजे मिळवले.

देव दिवाळीनिमित्त श्रीराम मंदिरात तयारी



समाचार/नगर-दि. २०

अहिल्यानगर येथील श्रीराम मंदिरात देव दिवाळीनिमित्त मंगळवार दि २४ नोव्हेंबर २०२६ रोजी आकर्षक विद्युत रोषणाई व दिपोत्सव करण्यात येणार असून या देव दिवाळीनिमित्त हजारो दीप प्रज्वलित करण्यात येणार असल्याची माहिती श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्यावतीने सांगण्यात आले. तसेच ता १६ नोव्हे रोजी श्रीराम मंदिरात अन्नकूट (छप्पनभोग) व भजन संध्या मंदिरात सर्व भक्तां समवेत मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला व २००० . भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला अशी माहिती ट्रस्ट चे अध्यक्ष प्रितम मुथ्था यांच्या वतीने देण्यांत आली

नवी पेठ येथील श्रीराम मंदिरात श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्या वतीने वर्षभरात विविध कार्यक्रम साजरे करण्यात येतात तसेच दर शनिवारी भक्तिभावाने रात्री ८ वाजता हनुमान चालीसा पठण व भजन संध्या व महाप्रसाद आयोजन करण्यात येते गेल्या १८वर्षापासून अविरतपणे ट्रस्टच्या माध्यमातून अनेक धार्मिक उत्सव या मंदिरामध्ये साजरा होत आहेत. देव दिवाळीनिमित्त अयोध्या च्या धर्तीवर श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट च्या वतीने श्रीराम मंदिरास आकर्षक अशी विद्युत रोषणाई व फुलांची सजावट करण्यात आली तसेच मंगळवार २४ रोजी हजारो दिव्यांनी दीप प्रज्वलित करून आकर्षक दिपोत्सव सजावट करण्यात येणार आहे तरी या उत्सवात नगर शहरातील भावीक भक्तांनी दर्शनासाठी उपस्थित राहावे असे श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट चे उपाध्यक्ष निखिल शेटिया नी सर्व अहिल्या नगर वासियांनी सहभागी व्हावे अशी आवाहन करण्यात आले आहे.

कथाकथन कार्यक्रमाचे नगरच्या देशमुख यांना निमंत्रण

समाचार/नगर-दि.२०

१९ वे राज्यस्तरीय महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलन सासवड येथे दि. २७ नोव्हेंबर रोजी, आचार्य अत्रे सांस्कृतिक भवन सासवड येथे संपन्न होत आहे. संमेलनाध्यक्षपदी जेष्ठ साहित्यिक, कवी इंद्रजीत भालेराव यांची निवड झाली आहे.



सदर राज्यस्तरीय साहित्य संमेलनात, अहिल्यानगरचे कथालेखक बाळासाहेब देशमुख यांना 'कथाकथन' कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात आले आहे.

साहित्य संमेलन आयोजक ज्येष्ठ साहित्यिक दशरथ यादव यांनी पत्र पाठवून, कथालेखक देशमुख यांना कथाकथन कार्यक्रमाकरिता निमंत्रित केले आहे. देशमुख, कथाकथन कार्यक्रमात 'पापी पेट का सवाल है' ही दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या जीवनावर ची कथा रसिक प्रेक्षकांसमोर सादर करणार आहेत. देशमुखांचे कथाकथन आजवर जिल्ह्यात ५०० प्रयोग पूर्ण झाले आहेत. शिवाय विविध आकाशवाणी केंद्रावर १२० कथा प्रसारित झालेल्या आहेत.

राजाश्रय ते लोकाश्रय

राजराजेश्वर चोलाच्या कारकिर्दीत नाटकाचे प्रयोग होतं हे आपण मागील लेखात पाहिलं. त्याकाळच्या नाटकातील प्रासंगिक देखावे, वादक आणि त्यांची वाद्ये, नृत्यातील विविध मुद्रा वगैरे गोष्टी कधीकधी मंदिरातल्या भिंतीवर कोरलेल्या दिसतात किंवा भित्तीचित्रात आढळतात. चारणांच्या ताफ्यातील मुख्य नटीला किंवा नर्तिकेला कधीकधी विशेष स्वरूपाचा आश्रय मिळत असे, असं विजयनगर सम्राटांच्या कारकिर्दीत दिसून येतं. तिला सुरक्षितता लाभून तिचं कलाशिक्षण निर्वेध रीत्या चालावे म्हणून तिला अंतःपुरात ठेवण्यात येई. याचा अर्थ असा नव्हे की, ती राजाची भोगदासी होती. तिचं कलाशिक्षण प्रापंचिक अडथळे न येता निर्वेधपणे चालावे आणि त्यात तिची उत्तरोत्तर प्रगती व्हावी, एवढाच त्या व्यवस्थेचा हेतू होता. तत्कालीन कलावंतांना असा राजाश्रय नसता तर, रंगभूमी जरी संपूर्ण लयाला गेली नसती, तरी तिचा अपकर्ष झाल्यावाचून राहिला नसता.



दुसऱ्या दृष्टीनं पाहिलं तर, राजाश्रयामुळे रंगभूमीला पुनरुज्जीवनाची संधी मिळाली. राजराजेश्वर नांगम' नृत्यनाट्याचा जो उल्लेख मागील लेखात कारण्यात आला त्यात केवळ नृत्य नव्हतं किंवा नाटकही नव्हतं , किंवा सर्वसामान्य लोकांना या माध्यमातून नवीन गोष्टीचं आकलन व्हावं असाही तो प्रकार नव्हता. केवळ मूक अभिनयाने आणि हावभावांनी नाट्याचा आशय लोकांना यशस्वीपणे आकलन होऊ शकला आणि त्याला लोकभाषेची जोड मिळाली तर तो अधिक प्रभावशाली होणार नाही का? तर बुद्धीवान चारणमंडळींनी या माध्यमाचा चतुराईनं स्वीकार केला. बाराव्या शतकाच्या सुमारास वंग देशाचा राजा लक्ष्मणसेन याने आपला राजकवी जयदेव याने रचलेल्या, गीतगोविंदा' चा प्रयोग करण्यास प्रोत्साहन दिलं. ही एक नवीच कलाकृती होती. ती वीरगाथा नव्हती आणि तिच्यात नाटकी संवादही नव्हते. ती राधाकृष्णाच्या प्रेमाची काव्यमय कथा आहे. प्रेमिकांच्या विरहाचे आणि मिलनाचे प्रसंग त्यात ग्रंथीत केले आहेत. राधेची सखी ही प्रेमकथा निवेदन करणारी असून राधाकृष्णाचे प्रणयाचे संदेश परस्परांना पाठवण्याचे दूताचे कार्य ती करते. या काव्यात सुरेल संगीतही आहे. त्यातल्या भावभावना नृत्यांनी आणि मुद्रांनी दाखवण्यासारख्या असून बरीचशी वर्णनं वृंदगीतांच्या साहाय्याने प्रदर्शित करतात. चारणांच्या नाट चाला गीतगोविंदा' मुळे अभिजात कलेची आणि रीतीची जोड मिळाली.

रंगभूमीला अन्य प्रकारे आश्रय देणाऱ्या काही राजांची उदाहरणं सांगता येण्यासारखी आहेत.जोधपूरच्या राजाने प्रबोधचंद्रोदय' या संस्कृत नाटकाचे हिंदी भाषेत भाषांतर केलं. हिंदी साहित्यातील हे पहिलं नाटक मानलं जातं. कदाचित यातून प्रेरित होऊन नाटकाचं पंजाबी भाषेतही भाषांतर झालं असावं(इ. स. १७८९). त्यापूर्वीच चौदाव्या किंवा पंधराव्या शतकात याचं नाटकाचं दोघा राजकवीनी तेलगू भाषेत भाषांतर केलं होतं. याच सुमारास ओरिसाचा राजा प्रतापरुद्र याने वेणीसंहार' या संस्कृत नाटकाचं उडिया भाषेत रूपांतर केलं होतं. या सर्व उपक्रमात लोकांपर्यंत नाटक पोचवण्याचा मुख्य उद्देश होता आणि त्यासाठी जनतेची भाषा आणि सर्वाना समजेल अशी अभिनयाची भाषा उपयोगात आणली होती.

आठव्या शतकापासून पंधराव्या शतकापर्यंतचा काळ देशात अराजकाचा आणि विघटनाचा काळ होता, तरी पण आश्चर्याची बाब ही की याचं काळात नव सांस्कृतिक जागृतीची स्पंदनं निर्माण झाली होती. काय होती ती स्पंदनं पाहुच पुढील लेखात.

- देवाशिष शेडगे

मो.८८०६०४४४८६



राशीभविष्य

- **मेष :** कार्यात उत्तम प्रगती होईल. गेलेल्या संधी पुन्हा लाभणार आहेत. उपजत कला-गुणांना वाव मिळेल.
- **वृषभ :** नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. बाकी चिंता नसावी.
- **मिथुन :** महत्त्वाची कामं प्रलंबित राहतील. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी. प्रकृतीच्या तक्रारी राहतील.
- **कर्क :** नव्या योजनांना गती मिळेल. धार्मिक स्थळांची यात्रा घडेल. वैद्यकीय कारणांसाठी धावपळ होईल.
- **सिंह :** आर्थिक बाबतीत दिलासा मिळेल. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. जुनी येणी सहज वसूल होतील.
- **कन्या :** आजचा दिवस अडचणींचा राहील. नोकरीत ताण-तणाव वाढीस लागतील. प्रकृतीची काळजी घ्या.
- **तूळ :** अचानक धनलाभ संभवतो. मंगलकार्याची बोलणी सफल ठरतील. अनावश्यक खर्च टाळायला हवा.
- **वृश्चिक :** मोठे व्यवहार शक्यतो टाळावे. दिलासादायक घटना घडतील. कार्यकर्तृत्त्वाचा उचित वाव मिळेल.
- **धनु :** अर्थाजेनाचे नवे पर्याय समोर येतील. वैवाहिक सौख्य लाभेल. भागीदारी व्यवसायात लाभ होईल.
- **मकर :** वरिष्ठांची मर्जी राहील. बदली, बढतीसाठी अनुकूलता लाभेल. कोर्टाची कामं वेळीच करून घ्यावीत.
- **कुंभ :** बोलण्यातून गैरसमज संभवतात. आर्थिक अडचणी वाढत जातील. मौल्यवान वस्तुंची काळजी घ्या.
- **मीन :** मनाप्रमाणे साऱ्या गोष्टी घडतील. मानसिक स्वास्थ लाभेल. विद्यार्थ्यांची अपेक्षित प्रगती होईल.

काय करू

पालकांचा विरोध आहे

सध्या माझ्यावर पालक किंवा प्रियकर यांच्यातल्या एकाची निवड करण्याची वेळ आली आहे. माझं एका मुलावर प्रेम आहे. पण घरच्यांना हे लग्न मान्य नाही. या मुलाशी लग्न केलं तर सगळे संबंध तोडून टाकण्याची धमकी माझ्या पालकांनी दिली आहे. माझी आई सतत आजारी असते. त्यामुळे मला तिला दुखवायचं नाही. मी आजवर माझ्या पालकांशी कधीच मोकळेपणाने बोलले नव्हते. त्यामुळे हे नातं उघड करणं मला जड गेलं. त्यातच प्रियकराचंही माझ्यावर खूप प्रेम आहे. तोही माझ्याशिवाय राहू शकत नाही. मी काय करू?

– तुझ्या पालकांना बसलेला धक्का पचवण्यासाठी तू त्यांना थोडा वेळ दे. त्यांना या सगळ्यातून बाहेर येऊ दे. तुझ्या अशा वागण्याचं त्यांना दु:ख झालं असेल. वातावरण निवळल्यावर तू तुझ्या पालकांशी बोल. त्यांना तुझी बाजू पटवून दे. त्यांची माफी माग. त्यांना दुखवायचा कोणताही उद्देश नसल्याचं सांग. शक्य असेल तर तुझ्या प्रियकराची पालकांशी भेट घडव. शांत रहा. अजिबात घाई करू नकोस. सकारात्मक विचार कर. तुझ्या प्रियकरालाही विश्वासात घे. पालकांना समजावण्यासाठी आप्तांची मदतही घेता येईल.

दिनविशेष

२१ नोव्हेंबर

१९६३ : सुप्रसिद्ध विनोदी लेखक चिंतामण विनायक जोशी अर्थात चिं.वि. जोशी यांचं निधन.

१९७० : भारतीय शास्त्रज्ञ सर सी. व्ही. रमण यांचं निधन.

२०१३ : 'तहेलका' साप्ताहिकाचे संपादक तरुण तेजपाल यांच्यावर महिला पत्रकाराने लैंगिक शोषण केल्याचा आरोप.

२०१५ : मालीची राजधानी असणाऱ्या वामाको येथील पंचतारांकित हॉटेलमध्ये दोन सशस्त्र दहशतवाद्यांनी १७० नागरिकांना ओलिस ठेवले.

टेक ज्ञान

गूगल शिकवते उच्चार

दोस्तांनो, इंग्रजी शब्दांचे उच्चार त्यांच्या स्पेलिंगप्रमाणे असतातच असं नाही. भलं मोठं स्पेलिंग असणाऱ्या इंग्रजी शब्दाचे उच्चार करताना आपण पुरते गोंधळून जातो. एखाद्या शब्दाचा उच्चार करायचा तरी कसा हा प्रश्न पडतो. त्यातच हा उच्चार बरोबर आहे किंवा नाही याचीही खात्री नसते. पण तुमचा मित्र बनून गेलेलं गूगल इथेही तुमची मदत करायला सज्ज आहे. गूगलचं एक फीचर कठीण शब्दांचा योग्य उच्चार करण्याबाबत मार्गदर्शन करते.

त्यासाठी तुम्हाला स्मार्टफोनमधल्या माईक आयकॉनवर क्लिक करून संबंधित शब्दाचा उच्चार करावा लागेल. या फीचरमधला आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता तो शब्द आणि त्या शब्दाचा तुम्ही केलेला उच्चार समजून घेईल. त्या शब्दाच्या योग्य उच्चाराशी तुम्ही केलेल्या उच्चाराची तुलना करेल. तुम्ही चुकीचा उच्चार केला असेल तर योग्य उच्चाराबाबत मार्गदर्शनही करेल. या फीचरमध्ये स्पीच रेकग्निशन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. सध्या तरी या फीचरचा वापर इंग्रजी शब्दांसाठीच करता येणार आहे. पुढे त्यात इतर भाषांचा समावेश करण्यात येईल.

आरोग्यमंत्र

लोहाची कमतरता

आहारात नेहमी पालेभाज्यांचा समावेश करायला हवा, असं आहारतज्ज्ञ आवर्जून सांगतात. याचं कारण पालेभाज्यांमध्ये विविध जीवनसत्त्व तसंच पोषक घटक मुबलक प्रमाणात उपलब्ध असतात. त्यामुळे आरोग्य उत्तम राहण्यासाठी आणि मुख्यत्वे शरीरातील पोषक घटकांची कमतरता भरून काढण्यासाठी आहारात पालेभाज्यांचा समावेश अवश्य करावा. अशा काही पालेभाज्यांचे औषधी गुणधर्म जाणून घेऊ...



* विविध भाज्यांमध्ये कोथिंबिरीचा वापर आवर्जून केला जातो. त्यामुळे पदार्थाना चव येते. ही कोथिंबीर उष्णता कमी करणारी तसंच पित्तशामक आहे. शिवाय ती हृदयरोगावरही अतिशय उपयुक्त मानली जाते.

* चाकवत पचण्यास सुलभ असुन ज्वरनाशक आहे. चाकवताची भाजी कृमीनाशक असुन यकृताच्या विकारांवर गुणकारी आहे. या शिवाय चाकवताच्या भाजीच्या सेवनाने त्वचेला कांती येते असंही दिसून आलं.

* मेथीची भाजी बहुतेकांना आवडते. त्यामुळे आहारात या भाजीचा समावेश अधिक प्रमाणात केला जातो. मेथीच्या भाजीमध्ये लोहाचं प्रमाण बरंच अधिक असतं. मेथीचं बी वातहारक तसंच शक्तीकारक असतं. मातेच्या दुधवाढीसाठी हे उपयोगी ठरतं.

* शेवग्याची भाजी ही वातनाशक आणि पित्तनाशक असते. याच्या सेवनाने हृदय तसंच रक्ताभिसरणाच्या क्रियेत सुधारणा होण्यास मदत होते.

भटकंती

नोव्हेंबर ते मार्च या काळात इथे फिरता येईल. जबलपूरला उतरून बांधवगडला जाता येईल. विविध प्रकारची झाडं, झुडपंही इथे पहायला मिळतील. पक्षीप्रेमी, प्राणीप्रेमी,निसर्गप्रेमी प्रत्येकासाठीच इथे काही तरी खास आहे. साप,अजगर कासव असे प्राणीही इथे पहायला मिळतात.

थंडीत इथलं तापमान दोन अंशांपर्यंत जातं. त्यामुळे थंडीच्या दिवसात बांधवगडला जाणार असाल तर गरम कपडे न्यायला विसरू नका. मग निघताय ना, बांधवगडला मनसोक्त भटकंती करायला...

पंचांग

शनिवार, २१ नोव्हेंबर २०२६

पराभवनाम संवत्सर शके १९४८, कार्तिक शु. १२, चंद्रराशी : मीन, नक्षत्र : रेवती, योग : सिद्धि, सूर्योदय ६.५१, सूर्यास्त ५.५८

फॉरवर्ड्स

एक ही समानता है
पतंग और जिन्दगी में,,,

ऊँचाई में हो तब तक ही
वाह-वाह होती हैं...!

करिअरवाटा

म्युझियॉलॉजितील वेधक कारकिर्द

अनेकांना इतिहास जाणून घेण्याची, त्या संदर्भात अधिक अभ्यास करण्याची ओढ असते. त्यादृष्टीने इतिहास, भूगोल, कला आदी विषयांचे चांगले ज्ञान असणाऱ्यांसाठी 'म्युझियॉलॉजी' हा कारकिर्दीचा उत्तम मार्ग ठरू शकतो. उत्तम लेखनाची क्षमता, संशोधनासाठी आवश्यक पात्रता तसेच अन्य काही भाषांचे ज्ञान असेल तर या क्षेत्रात चांगली कामगिरी करता येते. म्युझियॉलॉजीशी संबधित अनेक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. त्यात मास्टर्स इन म्युझियॉलॉजीला विद्यार्थी प्राधान्य देऊ लागले आहेत. यासाठी इतिहास, आर्कियॉलॉजी, एंथ्रोपोलॉजी, संस्कृत, फाईन आर्टस, फिजिक्स, केमिस्ट्री, बॉटनी, जियॉलॉजी, अर्थ सायन्स, ॲग्रीकल्चर, एन्व्हायर्नमेंटल सायन्स, मरिन सायन्स या विषयातील पदवी किंवा मास्टर्स डिग्री मिळवणारे पात्र ठरतात. म्युझियॉलॉजीशी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर नॅशनल म्युझियम, आर्कियॉलॉजिकल म्युझियम, प्रायव्हेट म्युझियम तसेच आर्ट गॅलरी आदींमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध होतात. यात क्युरेटर, रिसर्च असोसिएट, प्रबंधक अशा पदांवर काम करता येते. परदेशातही नोकरीच्या संधी उपलब्ध होतात. या संदर्भातील अभ्यासक्रम नॅशनल म्युझियम इन्स्टिट्युट, नवी दिल्ली, एम एस युनिव्हर्सिटी बडोदा, कोलकता युनिव्हर्सिटी, बनारस हिंदू युनिव्हर्सिटी, वाराणसी, अलिगढ मुस्लिम युनिव्हर्सिटी या ठिकाणी उपलब्ध आहेत.



खेचाखेची

वेडेपणा

इंटरनेटने लोक एवढे वेडे झालेत, की...

.
.
.
.
.

काल मेडीकल स्टोअरमध्ये एक जण ५०० एमजीच्या गोळी ऐवजी ५०० एमबीची गोळी मागत होता.


वेगळं काही

सध्याच्या काळात लहान मुलं काय करतील याचा नेम नाही. आता हेच बघा. मध्यंतरी हैदराबादच्या अवघ्या आठ वर्षांच्या मुलीने एका दिवसात दोन विश्वविक्रम केले. पीडीव्ही सहरुदा असं या चिमुकलीचं नाव आहे. तिने २० मिनिटांमध्ये ओरिगामीच्या १०२ कलाकृती तयार केल्या आणि तेवढ्याच वेळात ३५० सिरॅमिक टाईल्स तोडल्या. तिच्या या विक्रमांना 'एलीट वर्ल्ड रेकॉर्डस एलएलसी यूएसए'ने मान्यता दिली आहे. याआधी टाईल्स तोडण्याचा विक्रम उत्तर कोरियाच्या महिला खेळाडूच्या नावे होता. तिने २० मिनिटांमध्ये २६२ टाईल्स तोडल्या होत्या. सहरुदाला एकाच दिवशी तीन विक्रम करायचे होते. मात्र तिला तिसरा विक्रम करणं काही जमलं नाही.

सौंदर्यसाधना

नितळ, तजेलदार त्वचेसाठी...

सौंदर्याप्रती सजग असणाऱ्या महिलांसाठी 'केमिकल पील ऑफ' ही संकल्पना विचारात घेण्यासारखी आहे. खरं तर हे पील ऑफ फेशियलसारखेच असतात. यामुळे चेहऱ्यावरचे डाग, सुरकुत्या, काळपटपणा, पिंपल्स निघून जातात. विशेष म्हणजे होममेड पील ऑफ्सचा वापर करून नितळ, तजेलदार त्वचा मिळवू शकता. त्याच्या या टिप्स...



* 'मेलिक ॲसिड केमिकल पील ऑफ' बनवण्यासाठी एका सफरचंदाची सालं काढून पेस्ट बनवा. त्यात दोन मोठे चमचे कच्चं दूध आणि एक छोटा चमचा मध घाला. ही पेस्ट चेहऱ्यावर लावून अर्धा तासापर्यंत ठेवा. नंतर कोमट पाण्याने धुवून टाका. यामुळे सुरकुत्या कमी होण्यास मदत होते.

* 'ग्लायको ॲसिड पील ऑफ' बनवण्यासाठी दोन मोठे चमचे ब्राउन शुगर, चमचाभर मध, गुलाबजल हे सर्व मिसळून पेस्ट तयार करा आणि चेहऱ्याला लावा. वाळल्यानंतर हलक्या हातांनी पापुद्रे काढून टाका. नंतर चेहरा पाण्याने धुवा. यामुळे मृत त्वचा निघून जाते, चेहरा उजळ बनतो. ऊस ग्लायको ॲसिडचा सर्वोत्तम स्रोत आहे.

* 'टार्टरिक ॲसिड पील ऑफ'साठी ६-७ काळी द्राक्षं, अर्ध केळ या मिश्रणात चमचाभर मध घालून पेस्ट करा. ब्रशने चेहऱ्याला लावा. वाळल्यावर धुवून टाका.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahilyanagar (Ahmednagar) (M Corp), Dist.Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahilyanagar (M Corp), Dist Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code- 414 001, Maharashtra.
Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहिल्यानगर (अहमदनगर) (एम कॉर्प), जिल्हा-अहिल्यानगर (अहमदनगर), पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले.
संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

समाचार

शुक्रवार दि. २० नोव्हेंबर २०२६ पान ३

अर्ज़ किया है...

दुनिया ने तेरी याद से बेगाना कर दिया
तुझ से भी दिल-फ़रेब हैं ग़म रोज़गार के
- फैज़ अहमद फैज़

दिल-फ़रेब - मनाला भुलवणारे

आयुष्यात केवळ प्रेमाची किंवा भावनांची दुनिया पुरेशी नसते; पोटापाण्याचा प्रश्न आणि जबाबदाऱ्या माणसाला इतक्या घट्ट बांधून टाकतात की, कधीकधी त्या संघर्षांमध्येच माणूस रममाण होतो किंवा त्यातच हरवून जातो. प्रेमाची ओढ मनात असूनही, जगण्याच्या वास्तवापुढे ती कशी मागे पडतेकिंवा त्या वास्तवाचे गुंतागुंतीचे आकर्षण कसे मनाला वेढून टाकतेयाचे हे वास्तववादी आणि हळवे चित्रण आहे.

रोहित पवारांविरोधात डॉ. सुजय विखे आक्रमक

मुख्यमंत्र्यांवर आरोप केल्यास गप्प बसणार नाही

समाचार/नगर-दि.२०

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आ. रोहित पवार यांनी केलेल्या आरोपांना भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. अपघाताच्या तपासाच्या मुद्द्यावरून मुख्यमंत्र्यांना लक्ष्य करण्यामागचे कारण काय? कुटुंबीयांनीच प्रश्न उपस्थित केलेले नसताना आ. पवार एवढे पुढे का? आणि सीबीआयवर त्यांचा अचानक विश्वास कसा निर्माण झाला? असे सवाल करत डॉ. विखे यांनी आ. पवार यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. आ. पवार यांनी यापुढे मुख्यमंत्र्यांवर आरोप केल्यास गप्प बसणार नाही, असा इशाराही डॉ. विखे यांनी दिला आहे. अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर डॉ. विखे माध्यमांशी बोलत होते. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाचे राजकारण होऊ नये, ही आमची भूमिका आहे. अजितदादा हे आमचे नेते होते आणि त्यांच्याबद्दल आम्हाला मनापासून आदर आहे. मात्र, या संवेदनशील प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव विनाकारण गोवण्याचा प्रयत्न होत असेल, तर त्याला आम्ही उत्तर देणारच, असेही डॉ. विखे म्हणाले.



यावेळी डॉ. विखे यांनी आ. पवार यांच्या भूमिकेवर तीन प्रश्न उपस्थित केले. अजित पवार यांच्या अपघाताबाबत किंवा घातपाताच्या संशयाबाबत त्यांच्या कुटुंबीयांनी भूमिका मांडणे अपेक्षित आहे. त्यावर चर्चा होऊ शकते. मात्र, अजितदादांच्या कुटुंबीयांनी प्रश्न उपस्थित केले नसताना आ. पवार यांनी मुख्यमंत्र्यांवर आरोप करण्याचे कारण काय? सहा महिन्यांपूर्वी ईडीच्या कारवाईच्यावेळी केंद्र सरकारच्या तपास यंत्रणांवर अविश्वास व्यक्त केला. मग आता सीआयडीऐवजी सीबीआय तपासाची मागणी आ. पवार का करत आहेत? सीबीआयवर अचानक विश्वास कसा निर्माण झाला? तपास यंत्रणांबाबतची भूमिका बदलण्यामागचे नेमके कारण काय? आणि व्हीएसआर विमान कंपनीच्या मालकासोबत मुख्यमंत्र्यांचे छायाचित्र दाखविण्याचा प्रयत्न होतो. केवळ फोटोंचा आधार लावायचा असेल, तर ज्या अदानींवर खा. राहुल गांधी सातत्याने आरोप करतात. त्यांची गाडी चालवताना तुम्ही दिसता. त्याचे उत्तर तुम्ही देणार का? असे प्रश्न डॉ. विखे यांनी आ. पवार विचारले आहेत. अपघाताच्या तपासाबाबत कोणतीही शंका असल्यास निष्पक्ष चौकशी झालीच पाहिजे. आवश्यक पुरावे, व्हिडिओ आणि संबंधित माहिती समोर आली पाहिजे. मात्र, चौकशीच्या नावाखाली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनाकारण लक्ष्य करणे योग्य नाही. यापुढे मुख्यमंत्र्यांवर अशा प्रकारचे आरोप झाले, तर पक्ष म्हणून आणि वैयक्तिक पातळीवरही ठाम भूमिका मांडली जाईल, असा इशारा डॉ. विखे यांनी दिला आहे.

पान १ वरुन

सोने १ लाख २१ हजारांच्या खाली तर चांदीही दीड लाखांच्या आत

तर चांदीच्या दरात ७ टक्क्यांची घसरण झाली. त्यामुळे सोन्याचे भाव १० ग्रॅममागे जवळपास ६ हजारांनी तर चांदीचे दर किलोमागे १० हजारांनी कमी झाले. गेल्या १० महिन्यात सोने तब्बल ७० हजारांनी उतरले असून गगनाला भिडलेले चांदीचे दरही किलोमागे दीड लाखांच्या खाली आले. सोन्या चांदीचे भाव घसरण्यामागे अमेरिकेतील आर्थिक घडामोडींचे कारण असल्याचे सांगितले जात आहे. अमेरिकेतील महागाई अपेक्षेपेक्षा जास्त असल्याने तेथील केंद्रीय बँक असलेल्या फेडरल रिझर्व्ह बँक व्याजदर वाढविण्याचा विचार करीत आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांचा कल सोने चांदीपेक्षा डॉलरकडे वाढला आहे. सोने चांदी दरातील घसरणीमुळे गुंतवणूकदार आणि सराफ बाजारात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

एफडीएच्या कारवाईविरोधात औषध विक्रेते आक्रमक

अहिल्यानगर जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे सचिव आबासाहेब बेद्रे यांनी भूमिका मांडली आहे. औषध विक्रेत्यांवर होणाऱ्या अन्यायकारक कारवाया तातडीने थांबवाव्यात, त्यांना नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार अपील करण्याची पुरेशी संधी द्यावी आणि प्रशासनाने कारवाई करताना न्याय्य व समान निकषांचा अवलंब करावा, अशी त्यांची मागणी आहे.

ऊसदराबाबत समन्वयातून मार्ग काढण्यासाठी प्रयत्नशील-डॉ. विखे

त्यामुळे बँकेचा कारभार अधिक सक्षम, पारदर्शक आणि शेतकरीकेंद्रित करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असेही डॉ. विखे यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.

कुकाणा येथे १२ किलो गांजा पकडला

यास ताब्यात घेतले. ५ लाख ५९ हजार १०० रूपये किंमतीचा तीन गोण्यामधील ११.१८२ किलोग्रॅम वजनाचा गांजा, १,००० एक हजारचा वजन काटा, ३०० रूपयांची वजनमापे, २०० रूपयांचे स्टीलचे भांडे, १०० रूपयांच्या प्लॅस्टीक पिशव्या असा एकुण ५ लाख ६० हजार ७०० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. जप्त मुद्देमाल मल्हारी मोहन बोरूडे (रा.मजलेशहर, ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर) याच्याकडून खरेदी केला असल्याची माहिती आरोपीने सांगितली.

आ.जगताप, गोरखे यांच्यात मातंग समाजाच्या प्रश्नी चर्चा



समाचार/संगमनेर-दि.२०

भारतीय जनता पक्षाचे विधान परिषदेचे आमदार तथा युवा नेते अमित गोरखे यांचे अहिल्यानगर शहरात आमदार संग्राम जगताप यांच्या वतीने स्वागत करण्यात आले. सुभाष वाघमारे यांनी आमदार गोरखे यांचा सत्कार करून त्यांचे स्वागत केले. या भेटीदरम्यान मातंग समाजाच्या विविध सामाजिक, शैक्षणिक आणि विकासात्मक प्रश्नां वर त्यांच्याशी चर्चा करण्यात आली.

याप्रसंगी मातंग समाजाचे ज्येष्ठ नेते पंडित, वाघमारे, केतकी ग्रामपंचायतीचे उपसरपंच प्रकाश घोरपडे, युवा उद्योजक प्रदीप वावरे, ज्येष्ठ नेते सुनील उमाप आदी मान्यवर उपस्थित होते.

सुभाष वाघमारे म्हणाले की, भारतीय जनता पक्षातील युवा नेतृत्व म्हणून आमदार अमित गोरखे यांच्याकडे आशेने पाहिले जाते. त्यांनी सामाजिक, राजकीय आणि संघटनात्मक क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वातून स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन विकासाची वाटचाल करण्याची त्यांची भूमिका निश्चितच प्रेरणादायी आहे. युवकांचे प्रश्न, सामाजिक समरसता आणि वंचित घटकांच्या विकासासाठी त्यांचे नेतृत्व महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वासच त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, या भेटीत मातंग समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नां वर सविस्तर चर्चा करण्यात आली. समाजातील शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी शहरात आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून प्रश्नघ सुटत आहे. मात्र आवश्यहक असलेल्या उपाययोजना, समाजबांधवांना भेडसावणाऱ्या समस्या तसेच विविध मागण्यांकडे आमदार अमित गोरखे यांचे लक्ष वेधण्यात आले.

डॉ.नवले यांचा रविवारी गौरव सोहळा

समाचार/नगर-दि.२०

पीपल्स हेल्पलाइन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने या संकल्पनेअंतर्गत शेतकरी व आदिवासींच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करणारे झुंजार नेते कॉम्रेड डॉ. अजित नवले यांना स्वराज्यसेनानी' या किताबाने गौरविण्यात येणार आहे. रविवार, दि. २२ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता अहिल्यानगर येथील ऐतिहासिक हुतात्मा स्मारकात हा लोकगौरव सोहळा आयोजित करण्यात आला असल्याची माहिती ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी दिली.

डॉ. अजित नवले यांनी शेतकरी चळवळीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या प्रश्नांकना सातत्याने वाचा फोडली आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या कष्टकरी कुटुंबांना न्याय मिळावा, त्यांच्या श्रमाला योग्य मोबदला मिळावा आणि शेती क्षेत्रातील प्रश्नीची प्रभावी सोडवणूक व्हावी, यासाठी त्यांनी विविध आंदोलनांच्या माध्यमातून संघर्ष केला आहे.



यासोबतच पिढ्यान्पिढ्या वनजमिनीवर उदरनिर्वाह करणाऱ्या आदिवासी बांधवांना त्यांच्या हक्काच्या जमिनी मिळाव्यात, वनहक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी आणि आदिवासी समाजाला न्याय व सन्मानाचे जीवन जगता यावे, यासाठीही त्यांनी लढा उभारला आहे. वंचित आणि कष्टकरी घटकांच्या प्रश्नां साठी रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याची त्यांची भूमिका लक्षात घेऊन पीपल्स हेल्पलाइन आणि भारतीय जनसंसदेने त्यांची स्वराज्यसेनानी' या सन्मानासाठी निवड केली आहे.

या सोहळ्यात डॉ. अजित नवले यांना स्वराज्यसेनानी' हा लोकगौरव प्रदान करण्यात येणार असून, शेतकरी, आदिवासी, कष्टकरी, सामाजिक कार्यकर्ते आणि संविधानप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

व्हीएसआरचे मालक सिंग अमेरिकेला जाण्याच्या तयारीत- आ. पवार

समाचार/नगर-दि.२०

काही दिवसांपूर्वी आ. रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेतली होती. या पत्रकार परिषदेमध्ये अजित पवार यांच्या अपघातावर बोलताना त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संदर्भात मोठा दावा केला होता. यावरून भाजपने चांगलीच आक्रमक भूमिका घेतली आहे. दरम्यान, यावर प्रतिक्रिया देताना आता पुन्हा एकदा रोहित पवार यांनी व्हिएसआर कंपनीचे मालक व्ही. के. सिंग यांच्याबाबत मोठा दावा केला आहे. व्हिएसआर कंपनीचे सिंग अमेरिकेला जाण्याच्या तयारीत असल्याची माहिती आहे. सिंग यांनी पाच विमाने अमेरिकेत ट्रान्सफर केली आहेत, असा धक्कादायक दावा यावेळी आ. पवार यांनी केला आहे. रोहित पवार यांच्या या नव्या दाव्यामुळे आता चर्चेला उधाण आले आहे.

आ. पवार गुरूवारी नगरला आले होते. जिल्हाधिकारी कार्यालयात ते माध्यमांशी बोलत होते. विरोधकांवर टीका करताना, तुमच्या नेत्यांना वाचविण्यासाठी माझे पुतळे जाळले, माझ्यावर टीका केली. तुमच्या नेत्यांना



खूष करण्यासाठी हे सगळे करत आहात, मी तुम्हाला माफ करतो, असेही स्पष्ट केले.

अजितदादांच्या विमान अपघातप्रकरणाच्या चौकशीसाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना बुधवारी संध्याकाळी पत्र लिहून काही शंका उपस्थित केल्या आहेत. तसेच या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे देण्याची मागणी केली आहे. पत्रातील प्रश्नांवर अमित शाह यांच्या उत्तराची प्रतीक्षा आहे. आमच्याकडे काही महत्त्वाचे पुरावे आले असून ते आगामी काळात सादर करणार आहे.दरम्यान, अजितदादांना न्याय मिळवून देण्यासाठी एका पुतण्याच्या भूमिकेतून प्रयत्न सुरू आहेत. अजितदादांच्या प्रकरणात केलेले प्रेझेंटेशन हे राजकीय नसून अराजकीय दृष्टिकोनातून केले आहे. मोठ्या नेत्याला न्याय मिळत नसेल, तर सामान्य माणसाला न्याय कसा मिळणार? असा सवाल त्यांनी केला.

कोतवाली पोलिसांकडून चार तासात घटनेचा पर्दाफाश

फिर्यादीने रचला स्वत:च्याच घरात चोरीचा बनाव



समाचार/नगर-दि.२०

एका तरुणाने स्वत:च्याच घरात घरफोडी झाल्याचा बनाव रचल्याचा धक्कादायक प्रकार कोतवाली पोलिसांनी उघडकीस आणला आहे. ज्या तरूणाने घरफोडी झाल्याची फिर्याद पोलिसांत दिली, तोच या गुन्ह्याचा सूत्रधार निघाला. कोतवाली पोलिसांनी तक्रार दाखल झाल्यानंतर अवघ्या चार तासांत या प्रकरणाचा पर्दाफाश केला.आदर्श ज्ञानदेव तनपुरे (वय २५, रा. तानाजी मालुसरे अपार्टमेंट, मराठानगर, केडगाव, अहिल्यानगर) याने १८ नोव्हेंबर रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात घरफोडीची फिर्याद दिली होती. १७ नोव्हेंबरच्या रात्री ११.१५ ते १८ नोव्हेंबरच्या सकाळी ८ वाजण्याच्या दरम्यान कुटुंबीय घरी नसताना अज्ञात चोरट्याने फ्लॅटच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला आणि १ लाख २५ हजार रुपयांची रोकड चोरून नेल्याचे त्याने फिर्यादीत म्हटले होते.

त्यानुसार पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी गुन्हे शोध पथकाचे प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक विशाल चिटणीस व त्यांच्या पथकाला तपासाच्या सूचना दिल्या. पोलिसांनी घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. तसेच श्वानपथक, फिंगरप्रिंट पथक आणि फॉरेन्सिक युनिटच्या मदतीने घटनास्थळाची पाहणी केली. दरम्यान,तपासादरम्यान फिर्यादी आदर्श तनपुरे याच्या हालचाली संशयास्पद वाटू लागल्या. तो ऑनलाइन फॉरेक्स ट्रेडिंग करीत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यामुळे पोलिसांनी त्याला विश्वासात घेऊन कसून चौकशी केली. फिर्यादीने अखेर स्वत:च घरफोडीचा बनाव रचल्याची कबुली दिली. या प्रकरणी पोलिसांनी आदर्श तनपुरे याला अटक केली आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक विशाल चिटणीस, पोलीस उपनिरीक्षक दीपक मेढे, बाळकृष्ण दौंड, साबीर शेख, विनोद बोरगे, विशाल दळवी, संदीप शिरसाठ, सत्यजित शिंदे, सूरज कदम, शिरीष तरटे, अतुल कोतकर, रमेश शिंदे, अतुल लाटे, संकेत धीवर, वैभव काळे, आकाश काळे यांनी केली.

आ. रोहित पवारांनी केलेल्या आरोपांची चौकशी करावी - ॲड. लगड

समाचार/नगर-दि.२०

अजितदादा पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाला. तो घातपात आहे की अपघात, यावर आमदार रोहित पवार यांनी गंभीर आरोप केलेले आहेत. त्या सर्व आरोपांची खोलवर चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी ॲड. सुरेश लगड यांनी केली आहे.

ॲड.लगड म्हणाले स्व. अजितदादा यांच्या मृत्यू संदर्भात आमदार रोहित पवार यांनी संशय व्यक्त केला आहे. आमदार पवार यांनी महाराष्ट्र राज्यातील पोलीस ठाण्यात फिर्याद देण्याचा प्रयत्न केला असता, त्यांची फिर्याद घेण्याचे संबंधित पोलीस ठाण्याने नाकारले. गृहखाते हे मुख्यमंत्री यांच्याकडे असताना महाराष्ट्रातील पोलीस अधिकारी फिर्याद घेण्याचे टाळतात ही लाजीरवाणी गोष्ट आहे. अखेर आमदार रोहित पवार यांना कर्नाटक राज्यात जाऊन आपली फिर्याद दाखल करावी लागली. त्याचाही तपास अद्याप पर्यंत पुर्ण झाला नाही.

शायना एनसी विरोधात शिवसेनेची पोलिसात तक्रार

अवमानकारक कृत्याला माफी नाही - काळे

समाचार/नगर-दि.२०

हिंदुरुदयसम्राट पक्षप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे नसते तर आज चोरलेल्या शिवसेनेच्या माध्यमातून जे सत्तेच्या खुर्च्यांचा लाभ घेत आहेत ते कुठेतरी रिक्षा चालवत असते. पान टपरीवर असते. स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या करण्यात आलेल्या अवमानकारक कृत्याला महाराष्ट्र कधीही माफ करणार नाही, असा इशारा अहिल्यानगर महानगर प्रमुख किरण काळे यांनी दिला.

स्व. ठाकरे यांची प्रतिमा फाडण्याचे कृत्य घडल्याची बातमी समजताच अहिल्यानगर शहरातील शिवसैनिकांमध्ये तीव्र संतापाची लाट पाहायला मिळाली. महानगर प्रमुख काळे यांचे नेतृत्वाखाली शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने एकत्र होत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, प्रवक्ता शायना एनसी यांच्या प्रतिमांना जोडे मारून जोरदार घोषणा बाजी केली.



यावेळी माजी नगरसेवक संजय झिंजे, उपजिल्हाप्रमुख रावजी नागरे, उपजिल्हाप्रमुख दीपक भोसले, कामगार आघाडीचे विलास उबाळे, अनिस चुडीवाला, राम वाणी, आकाश आल्हाट, विकास भिंगारदिवे, प्रशांत वाघमारे, किशोर कोतकर, विनोद शिरसाट, जयराम आखाडे, गणेश आपरे, विशाल वाघमारे आदींसह पदाधिकारी, शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रावजी नांगरे, दीपक भोसले यांनी मनोगत व्यक्त केले.

दरम्यान, अहिल्यानगर शहर शिवसेनेच्या वतीने महानगरप्रमुख किरण काळे यांनी शायना एनसी हिच्या विरोधामध्ये शिवसैनिकांच्या भावना दुखावल्या प्रकरणी लेखी तक्रार दाखल केली आहे. तोफखाना पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्याकडे यावेळी तक्रार देण्यात आली. यावेळी शिवसैनिकांनी पोलीस स्टेशनमध्येच धरणे धरले होते. आगामी काळात अहिल्यानगर मध्ये शिवसैनिक अधिक आक्रमक भूमिका घेण्याच्या पवित्र्यात आहेत.

रतडगावात डोक्यात दगड घालून खून

समाचार/नगर-दि.२०

रतडगाव शिवारात (ता. नगर) डोक्यात दगड घालून खून केल्याची घटना उघडकीस आली आहे. सुभाष बाबासाहेब जगताप (वय ३५, रा. रतडगाव, ता. जि. अहिल्यानगर) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. रतडगाव परिसरात घडलेल्या या घटनेने खळबळ उडाली आहे. या प्रकरणी फिर्यादी युवराज अंबादास जगताप (वय २८, मूळ रा. रतडगाव, सध्या रा. केडगाव, ता. जि. अहिल्यानगर) यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. ही घटना १५ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास रतडगाव शिवारातील इनरकॉन कंपनीच्या कार्यालयाजवळ बाभळीच्या झाडाखाली घडली. आरोपीने अज्ञात कारणावरून सुभाष जगताप यांच्या डोक्यात दगड घालून त्यांना जीवे ठार मारल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

मुंबई शेअर भाव

जगभरात मंदीचे सावट
सोनेचांदी भाव कोलमडले मात्र
सेन्सेक्समध्ये ९०० ने वाढ

अशोक पटवा हजार
(शेअर सबब्रोकर)
फोन-२४५२५२७, २४५२२६४
मोबा. ८७८८६९९९६१

दिनांक २०-११-२०२६
दुपारी २ पर्यंतचे भाव

आजचा इंडेक्स :	८३७८५
एसीसी	१२६३-६४
एशियन पेंट	२५९९-२६००
बजाज ऑटो लि.	१०७८२-८३
बलराम फूड चिनी	६१८-१९
भारत फोर्ज	१७४६-४७
क्रॉम्प्टन	२२३-२४
डीएलएफ	७८९-९०
डॉ. रेड्डीज् लॅब	१३९२-९३
ग्रॅफाईट इंडिया	७६४-६५
हिंदुस्थान युनिलिव्हर	२०५३-५४
आयटीसी लि.	३०१-०२
एल ॲण्ड टी लि.	४२०२-०३
रिलायन्स इंड.	१३६७-६८
एसबीआय	११६५-६६
टाटा मोटर्स	२६६-६७
टाटा स्टील	१७८-७९
टीसीएस	२३७८-७९
लक्ष्मी ऑरगॅनिक	१५२-५३
सुवेन फार्मा	४६२-६३

बालदिनानिमित्त श्रुतनाटिकेची निर्मिती

समाचार/नगर-दि.२०

जागतिक बालदिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोंगरगण (ता. व जि. अहिल्यानगर) येथील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्वप्नांना बळ देऊया...!' या अभिनव श्रुतनाटिकेचे ध्वनिमुद्रण आकाशवाणी अहिल्यानगर केंद्रावर नुकतेच उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

यंदाच्या जागतिक बालदिनाची **My Day, My Rights, My Future'** अर्थात माझा दिवस, माझे हक्क, माझे भविष्य' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून या श्रुतनाटिकेची निर्मिती करण्यात आली आहे. बालकांचे हक्क, त्यांचे भावविश्व, स्वप्ने, आकांक्षा, शिक्षणातील समान संधी आणि सुरक्षित बालपण या महत्त्वपूर्ण विषयांना कवितांच्या, गीतांच्या आणि प्रभावी निवेदनाच्या माध्यमातून स्पर्श करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील कविता, गीतांचे सादरीकरण आणि ऐतिहासिक व्यक्तिरेखेच्या माध्यमातून आपली अभिव्यक्ती साकारली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेत महत्त्वपूर्ण योगदान देणारे वीर सरदार मुरारबाजी देशपांडे यांच्या शौर्याची आठवण करून देणारे एकपात्री स्वगतही या श्रुतनाटिकेचे विशेष आकर्षण ठरणार आहे. इतिहासातील प्रेरणादायी प्रसंगातून धैर्य, निष्ठा, स्वाभिमान आणि राष्ट्रप्रेमाची मूल्ये विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न



करण्यात आला आहे.

या श्रुतनाटिकेचा समारोप अत्यंत भावस्पर्शी आणि आशयपूर्ण संदेशाने होतो. मुलांना पंख देऊया, पण त्यांच्यासाठी आकाशही खुले ठेवूया' या विचारातून मुलांच्या स्वप्नांना प्रोत्साहन देण्याबरोबरच त्यांना योग्य संधी, स्वातंत्र्य आणि पोषक वातावरण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी समाजाची असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे.

'अमृतवाहिनी'त ऋणानुबंधाचा स्नेहमेळावा उत्साहात



समाचार/संगमनेर-दि.२०

ग्रामीण भागात असूनही गुणवत्ता आणि उच्च दर्जाचे शिक्षण देण्याची परंपरा अमृतवाहिनी शिक्षण संस्थेने सातत्याने जपली आहे. या संस्थेतून शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज देशात आणि परदेशात विविध महत्त्वाच्या पदांवर कार्यरत आहेत. ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. शिक्षणाच्या माध्यमातून अनेकांच्या जीवनात आनंद आणि समृद्धी निर्माण करण्याचे काम अमृतवाहिनीने केले असून भविष्यातही गुणवत्तेचा हा वारसा अधिक सक्षमपणे जपण्यासाठी सर्वांनी सांघिक प्रयत्न करावेत असे प्रतिपादन राज्याचे माजी शिक्षणमंत्री तथा अमृतवाहिनी विद्यापीठाचे कुलपती लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी केले.

अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या वतीने आयोजित ऋणानुबंधाचा स्नेहमेळावा' या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी माजी आमदार डॉ.सुधीर तांबे, संस्थेच्या सेक्रेटरी शरयू देशमुख, डॉ.जयश्री थोरात, विश्वस्त विलासवर्पे, प्राचार्य प्रा.व्ही.बी.धुमाळ, प्रा. जी.बी. काळे, प्रशासकीय अधिकारी डॉ.संदीप निंबाळकर, प्राचार्य डॉ.प्रसाद बाविस्कर, डॉ.बाबासाहेब लोंढे, डॉ. राजेंद्र वाघ, डॉ.मच्छिंद्र चव्हाण, आशिष कुमार, विलास भाटे, जे.बी.सेठी, अंजली कन्नावार, डॉ.राहुल सातपुते आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ.सुधीर तांबे, डॉ.जयश्री थोरात यांनीही मनोगत व्यक्त केले.

मनपा अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेतली समता, बंधुभावाची शपथ



समाचार/संगमनेर-दि.२०

माजी पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समता आणि बंधुभावाची शपथ घेतली.

महानगरपालिकेत आयोजित या कार्यक्रमप्रसंगी उपायुक्त मेहर लहारे, शेखर देशपांडे, सोनू चौधरी यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी सर्वांनी समता, बंधुता आणि सामाजिक एकोपा जपण्याची शपथ घेतली. याप्रसंगी उपायुक्त मेहर लहारे म्हणाले की, देशाच्या माजी पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी यांचे देशाच्या जडणघडणीत मोठे योगदान आहे. कृषी, शिक्षण, बँकिंग, परराष्ट्र धोरण, अर्थकारण आणि संरक्षण अशा विविध क्षेत्रांत त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. देशाच्या विकासप्रक्रियेत त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण असून, त्यांच्या कार्याचे स्मरण करणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.



गुरुवाणी ११७

द्वेष भावना दूर करा...

धर्म ऐकूनही धार्मिक लोकांविषयी आपल्या मनातील द्वेष समाप्त होत नाही. कारण चिंतन केले जात नाही. राजा प्रदेशीसाठी त्याची प्रिय पत्नीच मारेकरी का ठरली? हे असं का झालं? त्याने कधी राणी सूर्यकांताला काही कमी पडू दिले नाही. तो फक्त धर्म मार्गावर निघाला होता. तरीही तिच्या मनात वैरभाव निर्माण झाला. सुधारणाऱ्या व्यक्तीचा द्वेष केला तर तुम्ही धर्मसंघाचे होऊ शकता का? आपल्या मनात राजा प्रदेशी प्रती आपला श्रद्धाभाव असतो, राणी सूर्यकांता विषयी राग असतो. जो दुष्ट नाही, ज्याने आपल्या जीवनात बदल केले आहेत, त्याचे खरे तर अभिनंदन केले पाहिजे. ज्याच्यावर आपले प्रेम असते त्याच्या विषयी आयुष्यात कधी तरी द्वेषाची भावना निर्माण होतेच. याला कर्म संबंध म्हणतात. लहान मुलांना तुम्ही जेव्हा रागावता तेव्हा ते तुम्हाला डिसलाईक करतात, फक्त व्यक्त होत नाही. पण त्यांच्या मनात ते असतेच. एका वयानंतर मुलं तुमच्या पासून दूर जातात, कारण त्यांच्या मनातील जुनी डिसलाईकची भावना असते. सूर्यकांता राणीच्या मनातही अशीच डिसलाईकची भावना कधी ना कधी निर्माण झाली होती, जी राजा प्रदेशीने आपला मार्ग बदलल्यानंतर उफाळून आली. लक्षात ठेवा, धर्म केवळ ऐकण्यासाठी नसतो तर पूर्ण समजून घेण्यासाठी असतो. खाल्लेले पचवले नाही तर आजार तयार होतात. त्याचाच परिणाम आहे की, धर्म आराधना करणारा धर्म आराधना करणाऱ्या दुसऱ्याचा तिरस्कार करतो. असे व्यक्ती कधीही धार्मिक होऊ शकत नाहीत. 'धर्मी धर्मीसे प्यार करता है, जो पापी का सत्कार करता है वह धर्मी नहीं होता.' मी गुरूदेवांच्या भूमीत कायम संघ एक करण्यासाठी प्रयत्न केले. मी कधीही राणी सूर्यकांता बनण्याच्या यात्रेचे अनुमोदन करणार नाही. विपरीत विचारांपासून कायम अलिप्त राहा. परिवारात कधी कोणामुळे दुखावले गेला असाल तर लगेच ते कायमचे विसरून जा. मनात ठेऊ नका. कॅन्सर सारखा आजार शेवटच्या स्टेजवर पोहचल्यावर कळतो. द्वेषरूपी कॅन्सर सुद्धा लवकर कळत नाही, जेव्हा शेवटच्या स्टेजला पोहोचतो तेव्हाच कळतो. त्याला आपल्या आत संग्रहीत होऊ देऊ नका. आता चातुर्मासात योगदान देणाऱ्यांविषयी बोलतो. नगरच्या केमिस्ट असोसिएशनने जिल्हास्तरीय जैन महासंमेलनासाठी पुढाकार घेत सुंदर नियोजन केले. सकल राजस्थानी संघ, बडीसाजन युवा संघ, जॉईज, सारसनगर युवा मंडळ सर्वांचे खूप खूप अभिनंदन. चातुर्मास काळात वैद्यकीय सेवा देणाऱ्या डॉक्टरांचेही अभिनंदन,

उपाध्याय प्रवर
पू.श्री.प्रवीणऋषिजी म.सा.

समाचार
वाचकांना नम्र सूचना

समाचार वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

सोनोग्राफीतील बाळाचा चेहरा आता थ्रीडी स्वरूपात

साप्ताहिक संवाद

गर्भधारणेदरम्यान सोनोग्राफी करताना स्क्रीनवर दिसणाऱ्या बाळाच्या चेहऱ्याकडे आई-वडील दोघेही मोठ्या उत्सुकतेने पाहतात. बाळाचे नाक, डोळे आणि चेहऱ्याची ठेवण पाहण्याचा हा क्षण त्यांच्यासाठी खास असतो. आतापर्यंत ही आठवण केवळ सोनोग्राफीच्या प्रतिमांपुरती मर्यादित होती. मात्र, आता या प्रतिमांपासून बाळाच्या चेहऱ्याची थ्रीडी प्रतिकृती तयार करून ती प्रत्यक्ष पाहता येणार आहे. एआय तंत्रज्ञान आणि थ्रीडी प्रिंटिंगच्या मदतीने ही सुविधा आता भारतीयांसाठी उपलब्ध होणार आहे. अमेरिकेत विकसित झालेल्या या नव संशोधनाच्या अनुशंगाने डॉ. शीतल काबरा यांचाशी आजचा साप्ताहिक संवाद.

सोनोग्राफीद्वारे बाळाचा चेहरा थ्री डी स्वरूपात दिसणारे हे तंत्रज्ञान काय आहे?

अमेरिकेत विकसित झालेल्या या तंत्रज्ञानामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), प्रगत प्रक्रियेची प्रतिमा आणि थ्रीडी प्रिंटिंगचा वापर केला जातो. अल्ट्रासाऊंडमध्ये दिसणाऱ्या प्रतिमांचे विश्लेषण करून त्या प्रत्यक्ष हाताळता येतील अशा थ्रीडी मॉडेलमध्ये त्यांचे रूपांतर केले जाईल. ताइफप्रिंट ३डीची ही संकल्पना रेडिओलॉजिस्ट डॉ. आनंद भेरवानी, डॉ. संदेश रोठे आणि डॉ. शीतल काबरा यांनी वास्तव्यात उपलब्ध करून दिली आहे. अल्ट्रासाऊंडमधील प्रतिमांपासून अशी प्रतिकृती तयार करणे तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक असते. बाळाची गर्भातील स्थिती, प्रतिमांमधील रचना, हालचाली आणि चित्रांची गुणवत्ता यामुळे चेहऱ्याचे बारकावे स्पष्टपणे मिळवणे कठीण होऊ शकते. त्यामुळे प्रतिकृती तयार करण्यापूर्वी उपलब्ध प्रतिमांची गुणवत्ता तपासली जाते आणि त्यावर आवश्यक प्रक्रिया केली जाते.

या वैद्यकीय तंत्रज्ञानाला संशोधनाचा आधार आहे का?

या तंत्रज्ञानाला संशोधनाचाही आधार आहे. २०२० मध्ये 'जर्नल ऑफ ऑब्स्टेट्रिक, गायनॅकॉलॉजिक अँड निओनेटल नर्सिंग या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या एका अभ्यासात ९६ गर्भवती महिलांचा समावेश होता. यामध्ये केवळ सोनोग्राफीच्या प्रतिमा पाहणाऱ्या महिलांच्या तुलनेत बाळाची थ्रीडी प्रतिकृती मिळालेल्या महिलांमध्ये आई आणि गर्भातील बाळ यांच्यातील भावनिक नात्याची जाणीव अधिक वाढल्याचे आढळून आले आहे. थ्रीडी प्रतिकृती मिळालेल्या गटात ही वाढ सरासरी ८.७ टक्के, तर केवळ सोनोग्राफी प्रतिमा पाहिलेल्या गटात ४.९ टक्के होती.

पालकांसाठी गर्भातील बाळाचा पहिला चेहरा पाहणे हा आयुष्यभर स्मरणात राहणारा क्षण असतो. ही आठवण प्रत्यक्ष हातात घेता येईल अशा स्वरूपात जतन करण्याची संधी या तंत्रज्ञानातून मिळणार आहे. यासाठी वैद्यकीय कारणांसाठी आधीच करण्यात आलेल्या सोनोग्राफीच्या प्रतिमांचाच वापर केला जाणार असून, केवळ प्रतिकृती तयार करण्यासाठी अतिरिक्त सोनोग्राफी करण्यास प्रोत्साहन दिले जाणार नाही.

गर्भातील बाळाच्या प्रतिकृतीपुरतेच हे तंत्रज्ञान मर्यादित राहणार का?

गर्भातील बाळाच्या प्रतिकृतीपुरतेच हे तंत्रज्ञान मर्यादित राहणार नाही. सीटी स्कॅन आणि एमआरआयमधील प्रतिमांच्या आधारे हृदय, फुफ्फुसे, श्वसनमार्ग, यकृत, मूत्रपिंड, मेंदू, मणका, हाडे आणि रक्तवाहिन्यांची थ्रीडी मॉडेल तयार करण्यावरही कंपनीकडून संशोधन केले जात आहे. या प्रतिकृतींमुळे मानवी शरीरातील अवयवांची रचना समजून घेणे सोपे होऊ शकते. वैद्यकीय शिक्षण, प्रात्यक्षिके तसेच डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील संवादासाठी याचा नक्कीच उपयोग होऊ शकतो. एआय आणि आधुनिक संगणकीय तंत्रज्ञानामुळे वैद्यकीय प्रतिमांचा वापर करण्याच्या पद्धती बदलत आहेत. पूर्वी अतिशय वेळखाऊ आणि तांत्रिकदृष्ट्या कठीण असलेली कामे आता अधिक सुलभ होत आहेत.

Sataack ५० लीगची घोषणा; महिला सक्षमीकरणावर विशेष भर

क्रीडांगण



तळागाळातील टेनिस बॉल क्रिकेटला व्यावसायिक व्यासपीठ मिळवून देण्यासह महिला क्रिकेटला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने स्टॅक स्पोर्ट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेडतर्फे Sataack ५० या नव्या क्रिकेट लीगची घोषणा करण्यात आली. संस्थापक विजय अरोड़ा यांच्या पुढाकाराने सुरू होणाऱ्या या लीगची घोषणा क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी केली. लीगचा पहिला हंगाम फेब्रुवारी २०२७ मध्ये मुंबईत रंगणार असून, भारतीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू यात सहभागी होणार आहेत.भारताचे माजी क्रिकेटपटू वीरेंद्र सेहवाग लीग आयुक्त म्हणून, तर पॉल निक्सन मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळणार आहेत.या लीगमध्ये एकूण १२ संघ असतील. त्यापैकी सहा पुरुषांचे आणि सहा महिलांचे संघ असतील. १८ ते ३० वयोगटातील खेळाडूंना यात सहभागी होता येणार आहे. प्रत्येक डावात १० षटके असून, प्रत्येक षटकात पाच वैध चेंडू टाकले जातील, या वेगळ्या स्वरूपामुळे सामने अधिक वेगवान आणि रंजक करण्याचा प्रयत्न आहे.गुणवंत खेळाडूंना संधी देण्यासाठी देशातील सुमारे १५ शहरांमध्ये मोफत निवड चाचण्या आयोजित करण्यात येणार आहेत. अमृतसर, दिल्ली, बंगळुरू, हैदराबाद, जयपूर, भोपाळ, गुवाहाटी, चेन्नई आणि गोवा यांसह विविध शहरांचा यात समावेश आहे. चाचण्यांच्या तारखा आणि ठिकाणांची माहिती लवकरच जाहीर केली जाणार आहे. खेळाडूंची निवड नोंदणी, प्राथमिक तपासणी, प्रत्यक्ष चाचणी, कामगिरीचे मूल्यमापन आणि क्रमवारी या टप्प्यांद्वारे केली जाईल. निवड झालेल्या खेळाडूंना लीगच्या खेळाडू गटात स्थान दिले जाईल.

शब्दखेळ - ६५१

खाली दिलेल्या चौकोनात एका दिवाळी अंकाचे नाव लपलेले आहे शोधा पाहू.

डा	क	न	वि	नि	च	बे	र्ण
ण	जे	ध	ळी	गु	स	स	डा
का	ता	बा	शो	भ	मा	सी	ब्र
जा	ट	रू	रा	द	ल	क	पा
शो	को	इ	ड	जा	क	ई	ग
व	य	लां	बि	ना	ह	दे	बा
द	ळ	षां	इ	उ	स्था	ड	ल
ळ	रू	ल	इ	व	णी	खा	य

शब्दखेळ - ६५० चे उत्तर

ब	अ	रा	खा	ता	य	चा	यि
प	व	आ	न	ल	म	इ	क
त	चो	र	गुं	व	आं	क	प
रा	ली	ची	ती	र्गा	बे	खा	ळ
जि	दा	रू	त्या	न	रा	प्र	वा
त	जं	आ	सु	व	सा	इ	ण
से	त	ने	णू	पा	डी	ज	दि
ह	कु	प	ख	ग	ळ्ळा	मे	त

उत्तर - बरसात

आंध्र प्रदेशातील नवीन टुरिझम हब

चला पर्यटनाला



आंध्र प्रदेश, भारताचा एक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा असलेले राज्य, आता एक नवीन पर्यटन स्थळ सुरू करून पर्यटकीय आकर्षणांच्या नकाशावर आणखी एक ठसा उमठवत आहे.या नवीन स्थळामुळे आंध्र प्रदेशाच्या पर्यटन उद्योगाला नवे वळण मिळणार आहे. आंध्र प्रदेशातील नवीन पर्यटन स्थळ सरप्राईज बीच रिसॉर्ट' म्हणून ओळखले जात आहे. हे स्थळ विशाखापट्टणम जिल्ह्यात वसलेले आहे, जे सागरकिनाऱ्याच्या जवळ स्थित आहे. या ठिकाणी एक अत्याधुनिक रिसॉर्ट उभारण्यात आले असून, पर्यटकांना अत्यंत सुंदर निसर्गदृष्य आणि एक अद्वितीय अनुभव मिळवता येईल.विशाखापट्टणम, ज्याला द डोकल्ट डेस्टिनेशन म्हणून प्रसिद्ध आहे, हे एक महत्त्वाचे पर्यटन केंद्र आहे. याठिकाणी समुद्र, जंगल, आणि सहलींचे आकर्षण असलेले बरेच ठिकाणे आहेत. नवीन रिसॉर्ट पर्यटकांना आरामदायक निवासाची सुविधा देतो, तसेच तेथील संस्कृती आणि स्थानिक जीवनशैलीचे अनुभव घेण्याची संधी मिळवतो. हा नवीन रिसॉर्ट विशाखापट्टणमच्या बाहेरील एका निसर्गदृश्य वादळ क्षेत्रात स्थित आहे. या ठिकाणी आंध्र प्रदेशाच्या सागरी किनाऱ्याचे सौंदर्य आणि साहसी क्रियाकलाप यांचा अनोखा मिलाफ आहे. रिसॉर्ट पर्यटकांना समुद्रकिनाऱ्यावर चालायला, जलक्रीडा आणि कॅम्पिंगसारख्या साहसी क्रियाकलापांचा अनुभव घेण्याची संधी प्रदान करतो. रिसॉर्टच्या जवळच एक सुंदर समुद्रकिनारा आहे, जिथे पर्यटक आरामदायक वेळी सर्फिंग, वॉटर स्कीइंग आणि बोटिंग सारख्या जलक्रीडांचा अनुभव घेऊ शकतात.



संकलन-संयोजन
सुशीलकुमार
susheelkumar80@yahoo.com

कॅन्सर निदान व उपचार पद्धती यावर व्याख्यान

योग्य उपचारांनी कॅन्सर पूर्ण बरा होऊ शकतो - डॉ. भळगट

समाचार/नगर-दि.२०



आताच्या काळात कॅन्सरचे प्रमाण वाढले आहे. या आजाराचे निदान लवकर झाले पाहिजे. सामान्य पेशींचे खूप जास्त प्रमाणात विभाजन होणे म्हणजे कॅन्सर. कॅन्सर कोणालाही होऊ शकतो. यात दोन गोष्टी असतात. यातील एक गोष्ट म्हणजे जेनेटिक्स, जे आपल्या हातात नसते. दुसरी गोष्ट ज्या बाहेरून आपण ग्रहण केलेल्या असतात. यासाठी चांगला पोषक आहार घेणे गरजेचे आहे. वाढते प्रदूषण सिगारेट ओढण्या इतकेच घातक आहे. संपूर्ण सेंद्रिय अन्न आपण खाऊ शकत नाही. पण दारू, सिगारेट, तंबाखूला आपण स्वतः नियंत्रणात ठेवू शकतो. यावर पूर्ण नियंत्रण आणले तरी ३० टक्के कॅन्सर आपण थांबवू शकतो, असे मार्गदर्शन पुणे येथील कॅन्सर सर्जन डॉ. भूषण भळगट यांनी केले.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या पवित्र कर्मभूमीत आनंदधाम परिसरातील आनंद तीर्थ समवशरण येथे् समर्पण चातुर्मास २०२६ संपन्न होत आहे. या ठिकाणी शुक्रवारी पुणे येथील प्रसिद्ध कॅन्सर सर्जन डॉ. भूषण भळगट यांचे कॅन्सर निदान व उपचार पद्धती या विषयावर जनजागृतीपर व्याख्यान झाले. उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा., तिर्थेशऋषीजी म.सा. यांच्या सान्निध्यात झालेल्या या व्याख्याना प्रसंगी आमदार संग्राम जगताप, धनश्री विखे, समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, केमिस्ट असोसिएशनचे, नगरसेवक दत्ता गाडळकर, डॉ. संजय भळगट, डॉ. माधुरी भळगट, इंदौर येथील संतोषमामा जैन आदी उपस्थित होते. प्रारंभी समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक बोरा यांनी डॉ. भूषण भळगट यांचा परिचय करून देत स्वागत केले, चातुर्मास कमिटीच्यावतीने उपाध्यक्ष अनिल पोखरणा यांनी डॉ.भळगट यांचा सत्कार केला.

मार्गदर्शन करताना डॉ. भळगट म्हणाले, एखादा तंबाखू खात नसला तरी त्याला कॅन्सर होऊ शकतो, याला जेनेटिक्स कारणीभूत असतात. अनेकांना वाटते कॅन्सर पूर्ण बरा होऊ शकत नाही. पण पहिल्या किंवा दुसऱ्या स्टेजचे कॅन्सर पूर्ण बरे होऊ शकतात. याचा अर्थ पूर्ण उपचारानंतर जो दहा वर्षे कॅन्सर मुक्त राहतो, तो बरा झाला असे समजावे. कॅन्सरची पहिल्या स्टेजमध्ये एकाच अवयवात असते. दुसऱ्या स्टेज मध्ये तो थोडा पसरतो. चौथ्या स्टेजमध्ये तो इतर अवयवात पसरलेला असतो. महिलांमध्ये स्तनाच्या कॅन्सरचे प्रमाण जास्त असते, आपल्याकडे पुरूषांमध्ये तोंडाच्या कॅन्सरचे प्रमाण जास्त असते. हे कॅन्सर पहिल्या स्टेज मध्येच ओळखले जाऊ शकतात. महिलांमध्ये मासिक पाळी जितकी कमी असते तितके स्तनाच्या कॅन्सरचे प्रमाण कमी असते. आजकाल लग्नाला विलंब, मूल लवकर न होऊ देणे अशा कारणांमुळे स्तनाच्या कॅन्सरचे प्रमाण वाढले आहे. गर्भ पिशवीच्या मुखाचा कॅन्सर इन्फेक्शनमुळे होतो. त्यावर आज प्रभावी लसीकरण उपलब्ध आहे. लठ्ठपणा, मधुमेह असेल तर गर्भ पिशवीचा कॅन्सर होण्याची शक्यता अधिक असते. तोंडाचा कॅन्सर तंबाखू न खाणाऱ्यांनाही होतो. दात धारदार असतील, दातांचे इंम्प्लांट ढिले असतील तरीही तोंडाचा कॅन्सर होऊ शकतो. स्तनाच्या कॅन्सरची गाठ खूप कडक असते, वेगाने वाढणारी असते.



राधा-कृष्ण मंदिरात छप्पन भोग अन्नकोट उत्सव

समाचार/नगर-दि.२०

शहरातील सर्जेपुरा येथील पंजाबी सनातन धर्मसभेच्या राधा-कृष्ण मंदिरात छप्पन भोग अन्नकोट उत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. भगवान श्रीकृष्णाला विविध प्रकारच्या मिठाई, फराळ आणि पारंपरिक खाद्यपदार्थांचा छप्पन भोग अर्पण करून महाआरती करण्यात आली. या धार्मिक सोहळ्याला शीख व पंजाबी समाजातील भाविकांसह महिला आणि शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शनाचा व प्रसादाचा लाभ घेतला.

उत्सवाच्या प्रारंभी मंदिर परिसरात भजन-कीर्तनाचा भक्तिमय कार्यक्रम रंगला. गायक गिरीराज जाधव यांनी विविध भक्तिगीतांचे सादरीकरण करून उपस्थितांना भक्तिरसात तल्लीन केले. 'राम राम सीताराम...', 'देना हो तो दीजिये जन्म जन्म का साथ...', 'महाकाल सरकार मेरे...' यांसारख्या भक्तिगीतांनी कार्यक्रमात रंगत आणली. तर 'ओ पालनहारे...' या गीताच्या सादरीकरणाने संपूर्ण मंदिर परिसर भक्तिमय झाला. भगवान श्रीकृष्णाच्या गीतांनी वातावरणात चैतन्य निर्माण केले. उपस्थित महिला आणि भाविकांनीही भक्तिगीतांचा मनमुराद आनंद घेतला.

पंजाबी सनातन धर्मसभेचे ट्रस्टचे अध्यक्ष राकेश गुप्ता, विश्वशस्त मंडळातील सदस्य आणि प्रमुख मान्यवरांच्या हस्ते भगवान श्रीकृष्णाची विधिवत महाआरती करण्यात आली. आरतीच्या वेळी उपस्थित भाविकांनी भक्तिभावाने सहभाग घेतला. आरतीनंतर सर्व भाविकांना महाप्रसाद (लंगर) आणि प्रसादाचे वाटप करण्यात आले. या अन्नकोट महोत्सवात विविध समाजघटकांतील भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. भजन-कीर्तन, छप्पन भोगाचा नैवेद्य, महाआरती आणि महाप्रसाद अशा विविध धार्मिक कार्यक्रमांनी सर्जेपुरा येथील राधा-कृष्ण मंदिर परिसर भक्तिमय झाला होता.

जामखेडमधील कलाकेंद्रावर कारवाईची मागणी

समाचार/नगर-दि.२०

जामखेड शहर तसेच मोहा हद्दीतील अनधिकृत कला केंद्रांविरोधात आणि तेथे सुरू असलेल्या कथित अवैध धंद्यांविरोधात अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघाचे अहिल्यानगर जिल्हा युवा जिल्हाध्यक्ष सचिन दत्तात्रय आजबे यांनी प्रशासनाकडे तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. वारंवार उपोषणे करूनही स्थानिक पातळीवर कोणतीही दखल किंवा कायदेशीर कारवाई होत नसल्याचा आरोप करत त्यांनी आता थेट नाशिक येथील विभागीय आयुक्तांकडे निवेदनाद्वारे कारवाईची मागणी केली असून, या निवेदनाची प्रत नाशिक परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक यांनाही माहितीस्तव रवाना करण्यात आली आहे.

दि. १९ नोव्हेंबर २०२६ रोजी सादर करण्यात आलेल्या या निवेदनात नमूद केले आहे की, जामखेड शहरातील व मोहा हद्दीतील अनधिकृत कला केंद्र आणि तेथील अवैध प्रकारांविरोधात यापूर्वी तहसील कार्यालय तसेच जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनेक वेळा उपोषणे करण्यात आली. मात्र, अद्याप न्याय मिळालेला नाही किंवा ठोस कायदेशीर कारवाई झाल्याचे दिसून आलेले नाही.

विभागीय आयुक्तांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालून कठोर व कायदेशीर कारवाई करावी, अशी अपेक्षा निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. कारवाई न झाल्यास येत्या ०७ डिसेंबर २०२६ रोजी विभागीय आयुक्त कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा सचिन आजबे यांनी दिला आहे. तसेच, या काळात स्वतःच्या कुटुंबास काही विपरीत प्रकार घडल्यास किंवा जीवितहानी झाल्यास त्यास संबंधित प्रशासन व कला केंद्र मालक जबाबदार राहतील, अशी नोंदही निवेदनात करण्यात आली आहे.

दत्त जयंती महोत्सव पत्रिकेचे प्रकाशन; विविध उपक्रमांचे आयोजन

शंकर महाराज प्रकट दिन भक्तिमय वातावरणात साजरा



समाचार/नगर-दि.२०

श्री सूर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठान ट्रस्ट, दत्त कॉलनी, दातरंगे मळा, अहिल्यानगर यांच्या वतीने १७ नोव्हेंबर रोजी सद्गुरू श्री शंकर महाराज यांचा प्रकट दिन भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी विधिवत रुद्राभिषेकाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी १११ दत्तभक्तांनी श्रद्धापूर्वक शंकर गीता पारायण केले. त्यानंतर सद्गुरू श्री शंकर महाराज यांच्या पालखीची भक्तिमय मिरवणूक काढण्यात आली. भक्तांच्या उत्स्फूर्त सहभागाने परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने आगामी दत्त जयंती उत्सव २०२६ (२४ वे वर्ष) तसेच धार्मिक व सामाजिक उपक्रमांची माहिती देणाऱ्या महोत्सव पत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले. यासोबतच सन २०२७ च्या दिनदर्शिकेचेही मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. धार्मिक परंपरा जपत सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणण्याचा ट्रस्टचा प्रयत्न या आयोजनातून दिसून येत आहे.

दत्त जयंती महोत्सव हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून भक्ती, सेवा, समर्पण आणि सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम आहे. लोकसहभागातून साकारत असलेल्या या महोत्सवात भाविकांच्या सहकार्याला विशेष महत्त्व आहे. धार्मिक कार्यक्रमांसोबत गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप, रक्तदान शिबिर यांसारखे सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी आर्थिक सहकार्याची आवश्यकता आहे. त्यामुळे दानशूर व्यक्ती, उद्योजक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते आणि दत्तभक्तांनी या धर्मकार्यामध्ये सहभागी होऊन सढळ हाताने देणगी द्यावी, असे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

ट्रस्टचे प्रमुख सदस्य श्री. दीपक गुंडू यांनी दत्तभक्तांना उत्सवाच्या आयोजनासाठी आर्थिक सहकार्य करण्याचे आवाहन केले. प्रत्येकाने आपल्या क्षमतेनुसार दिलेले योगदान महोत्सवाच्या आयोजनाला बळ देणारे ठरणार असून, भक्तांच्या सहकार्याने धार्मिक आणि सामाजिक उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविता येणार आहेत. भक्तांनी देणगी बँक ऑफ महाराष्ट्रमधील ट्रस्टच्या खाते क्रमांक ६०५०९१२२८२२, आयएफएससी कोड चक्ह००००३५८ येथे जमा करावी. तसेच क्यूआर कोडच्या माध्यमातूनही देणगी अर्पण करता येणार आहे.

हिंदू मोची समाजाचे प्रलंबित प्रश्न सोडवू-आ.जगताप

समाचार/नगर-दि.२०



समाजामध्ये वावरत असताना प्रत्येकाने समाजाचे काहीतरी देणे लागते, या भावनेतून सर्वांनी सामाजिक कार्यात योगदान दिले पाहिजे. हिंदू मोची समाजाने एकत्रित येऊन वारुळाचा मारुती परिसरात जागा खरेदी केली असून, त्या ठिकाणी समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. समाजाच्या कार्यामध्ये राजकारण न आणता सर्वांनी एकत्रित येऊन हिंदू धर्माचे सण-उत्सव मोठ्या उत्साहात साजरे करावेत, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

अहिल्यानगर हिंदू मोची समाजसेवा संघाच्या वतीने समाजाचे विविध प्रश्न मार्गी लावल्याबद्दल आमदार संग्राम जगताप यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. आमदार जगताप म्हणाले की, वारुळाचा मारुती परिसर अनेक वर्षांपासून विकासकामांच्या दृष्टीने दुर्लक्षित होता. या परिसरातील रस्त्यांची कामे तसेच सीना नदीवरील पुलाचे काम मार्गी लावण्यात आले आहे. दातरंगे मळा परिसरापासून बायपासपर्यंतच्या रस्त्याचे काम पूर्णत्वास गेल्याने नागरिकांच्या दळणवळणाचा प्रश्न सुटण्यास मदत झाली आहे. जैनसमाजाच्या एकत्रित प्रयत्नांतून शहरात आनंद ऋषी हॉस्पिटल उभे राहिले. हिंदू मोची समाजाचे जे प्रश्न अद्याप प्रलंबित आहेत, ते सोडविण्यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील. तसेच राज्य शासनाकडेही याबाबत पाठपुरावा करण्यात येईल, अशी ग्वाही आमदार जगताप यांनी दिली.

हिंदू मोची समाजसेवा संघाचे ॲड. अविनाश साखला यांनीही मनोगत व्यक्त केले. या सत्कार सोहळ्याप्रसंगी रतनलाल पवार, सुभाष बायड, मनोहर चौहान, किरण सोनग्रा, नरेंद्र गोयल, अरुणाताई गोयल, संतोष गोयल, चंपालाल सोनग्रा, बालकिशन गोयल, पवन सोनग्रा, मगन सिसोदिया, चंदन पवार, कमलेश सोनग्रा, दीपक सोनग्रा, ॲकड. अविनाश साखला, अमित गोयल, मनीष सोनग्रा, बिपिन पीडीयार, राजेश पीडीयार, रामेश्वर चव्हाण, प्रितेश सोनग्रा, ॲनड. गणेश गोंडाळ, सागर देवकर, रवी साखला आदींसह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



महालक्ष्मी पूजा महोत्सव उत्साहात

समाचार/नगर-दि.२०

राहुरी फॅक्टरी येथे श्री माताजी निर्मला देवी यांच्या सहजयोगी भक्तांच्या वतीने आयोजित तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय श्री महालक्ष्मी पूजा महोत्सव भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. येथील शिवाजी विद्या निकेतनच्या भव्य क्रीडांगणावर झालेल्या या आंतरराष्ट्रीय सहजयोग सोहळ्यास देशाच्या विविध भागांसह परदेशातून मोठ्या संख्येने सहजयोगी साधक आणि भाविक उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे राहुरी फॅक्टरी परिसराला आंतरराष्ट्रीय आध्यात्मिक सोहळ्याचे स्वरूप प्राप्त झाले होते.

सहजयोगाच्या दृष्टीने राहुरी परिसराला विशेष आध्यात्मिक महत्त्व आहे. या महोत्सवात ध्यानधारणा, हवन, आध्यात्मिक मार्गदर्शन, विविध विषयांवरील चर्चासत्रे, युवाशक्ती व नारीशक्ती मार्गदर्शन, बालशक्ती सेमिनार, सांस्कृतिक कार्यक्रम, मेहंदी आणि हळदी समारंभ असे विविध उपक्रम पार पडले. 'महालक्ष्मी तत्त्वातून आरोग्य' या विषयावरील विशेष सत्रालाही प्रतिसाद मिळाला. श्री गणेश-गौरी पूजन, बारात आणि सहज विवाह सोहळ्याने महोत्सवाला पारंपरिक रंग चढला. कव्वालीच्या कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. महोत्सवाच्या अंतिम दिवशी सकाळी १०.३० वाजता मुख्य आंतरराष्ट्रीय श्री महालक्ष्मी पूजा भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. त्यानंतर उपस्थित साधक आणि भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

न्याय रक्षा परिषदेवर राज्य कार्यकारिणी अध्यक्षपदी भालारे

समाचार/नगर-दि.२०



न्याय रक्षा परिषद या सामाजिक व जनहिताभिमुख संघटनेच्या महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी नंदकिशोर उद्धवराव भालारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा संस्थापक प्रमुख ॲड. अंकित राज यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आली.

न्याय रक्षा परिषदेच्या माध्यमातून अन्यायग्रस्त नागरिकांना न्याय मिळवून देणे, सर्वसामान्यांच्या समस्या शासन व प्रशासनापर्यंत पोहोचविणे, तसेच शैक्षणिक, सामाजिक व जनहिताचे विविध उपक्रम राबविणे हे उद्दिष्ट आहे. नंदकिशोर भालारे हे सामाजिक क्षेत्रात सक्रिय असून वंचित, अन्यायग्रस्त आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने कार्यरत आहेत. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन तसेच संघटनेची ध्येयधोरणे राज्यभर प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. अंकित राज यांनी भालारे यांचे अभिनंदन करून पुढील सामाजिक व संघटनात्मक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

महिलांसाठी रविवारी कर्करोग निदान शिबीर

समाचार/नगर-दि.२०

महिलांमध्ये स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशय मुखाचा कर्करोग याबाबत जागरूकता निर्माण व्हावी, या आजारांची प्राथमिक लक्षणे वेळीच ओळखता यावीत आणि सुरुवातीच्या टप्प्यातच निदान होऊन योग्य उपचार मिळावेत, या उद्देशाने भारत भारती नगर महिला शाखेच्या वतीने रविवारी दि. २२ नोव्हेंबर रोजी मोफत कर्करोग निदान व जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर दुपारी ४ ते सायंकाळी ६ या वेळेत बालिकाश्रम रोडवरील श्री कमला आयुर्वेद हॉस्पिटल येथे होणार आहे, अशी माहिती भारत भारतीच्या अध्यक्षा स्वीटी पंजाबी यांनी दिली.

अधिक महिती देतांना सेक्रेटरी सोनल कांबळे म्हणाल्या, स्तनाचा व गर्भाशय मुखाचा कर्करोग या दोन्ही प्रकारच्या कर्करोगाचे सुरुवातीच्या टप्प्यात निदान झाल्यास योग्य उपचारांद्वारे रुग्ण बरे होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढते. मात्र महिला याकडे दुर्लक्ष करत असल्याने महिलांच्या आरोग्याचा हा गंभीर प्रश्न लक्षात घेऊन केवळ जनजागृती न करता प्रत्यक्ष तपासणी उपलब्ध करून देण्याचा उपक्रम भारत भारती महिला शाखेने हाती घेतला आहे. कर्करोगाचा धोका कमी करण्यासाठी कोणती काळजी घ्यावी आणि नियमित तपासणी का आवश्यक आहे, याबाबत तज्ज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे.

महिलांनी स्वतःची तपासणी करून घेण्याबरोबरच आपल्या मैत्रिणी, नातेवाईक आणि परिचित महिलांनाही या शिबिराची माहिती देऊन सहभागी होण्यासाठी प्रेरित करावे, असे आवाहन शिबिराच्या प्रमुख डॉ. अंशु मुळे, डॉ. प्रतिभा शिनगारे, डॉ. मानसी कांबळे, डॉ. नयना जगताप, डॉ. अनिता जोशी, डॉ. भारती पाचारणे, डॉ. रत्ना बल्लाळ, डॉ. संजीवनी कराळे आणि डॉ. तनुजा पोळ यांनी केले आहे. पुढाकार घेत आहेत. जास्तीत जास्त महिलांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन भारत भरतीच्या महिला शाखेच्या सदस्यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी डॉ. अंशु मुळे ९८६०६०७८०० व डॉ. मानसी कांबळे ९४०५५७०२६७ यांच्याशी संपर्क साधावा.

मेणबत्त्या प्रज्वलित करून भाविकांकडून दीपोत्सव साजरा

कथेतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

समाचार/नगर-दि.२०

दिल्ली गेट येथील सिद्धेश्वर महादेव मंदिर परिसरात सिद्धेश्वर महादेव मंदिर, श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट आणि उपमहापौर ॲयड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून आयोजित शिव महापुराण कथा सप्ताहाचा समारोप मोठ्या धार्मिक उत्साहात संपन्न झाला. समारोपाच्या दिवशी भाविक भक्तांची मोठी गर्दी झाली होती. ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या रसाळ वाणीतून शिव महापुराणाचे निरूपण करण्यात आले. यावेळी श्री शंकराचे कुटुंब व्यासपीठावर येताच भाविकांनी हर हर महादेव आणि नामाचा जयघोष करीत परिसर भक्तिमय केला. भाविकांनी मेणबत्त्या प्रज्वलित करून दीपोत्सवही साजरा केला.



समारोपाच्या दिवशी ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी संत तुकाराम महाराज यांच्या 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' या अभंगाचे निरूपण करताना वृक्षांचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले की, संतांनी त्या काळातच वृक्षांचे महत्त्व समाजाला पटवून दिले होते. मात्र, सध्या पर्यावरणाचा असमतोल वाढत असून त्याचे विपरीत परिणाम मानवी जीवनावर होत आहेत. त्यामुळे प्रत्येकाने वृक्षांचे महत्त्व ओळखून त्यांचे संवर्धन करणे आवश्यक आहे.

उपमहापौर ॲचड. धनंजय जाधव यांनी पुढील पिढीचा विचार करून पालकमंत्री ग्रीन सिटी मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेच्या माध्यमातून अहिल्यानगर शहर अधिकाधिक हरित व्हावे, अशी ईश्वरचरणी प्रार्थना असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी भाविकांना वृक्षांचे वाटप करून वृक्षसंवर्धनाची शपथ देण्यात आली. तसेच संत सावता माळी यांच्या कार्याचे आणि समाजातील योगदानाचे महत्त्वही महाराजांनी आपल्या निरूपणातून सांगितले.

शिव महापुराण कथेच्या समारोपप्रसंगी ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी बारा ज्योतिर्लिंगांचे महत्त्व विशद केले. उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या माध्यमातून धार्मिक सेवेची संधी मिळाली. यापूर्वीही श्री साईबाबा कथा आणि शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले होते. त्यालाही भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. शहरात पालकमंत्री ग्रीन सिटी मोहीम सुरू असून, या उपक्रमासाठी नागरिकांनी सहकार्य करावे. आगामी काळात तापमानवाढ आणि ऑक्सिजनची उपलब्धता यांसारखे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे केवळ वृक्षारोपण करून चालणार नाही, तर लावलेल्या वृक्षांचे संगोपन आणि संवर्धन करणेही तितकेच गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी श्री साई द्वारका सेवा ट्रस्टच्या वतीने भाविकांना वृक्ष आणि रुद्राक्षांचे वाटप करण्यात आले. धार्मिक कार्यक्रमासोबतच पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्याचा या उपक्रमातून प्रयत्न करण्यात आला. भाविकांनी मेणबत्त्या प्रज्वलित करून दीपोत्सव साजरा केला. श्री शंकराचे कुटुंब व्यासपीठावर येताच उपस्थित भाविकांनी नामाचा जयघोष केला. संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

शैक्षणिक ॲकॅडमीसाठी
रिसेप्शनिस्ट पाहिजे
* पात्रता *
किमान ग्रॅज्युएट,संभाषण कौशल्य आवश्यक
(महिला/मुलींना प्राधान्य)
-: संपर्क :-
8805087857

पाहिजेत
सिव्हील इंजिनिअर
D.C.E. / B.E.
अनुभवी/फ्रेशर
नवले बिल्डर्स
गुरूपद्मा अपार्टमेंटस्,
गुजरलेन, अहिल्यानगर
9326221864

शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्ट्रल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स, बांधकाची रांगोळी
डागा शांतीलाल डागा
दाळमंडई/मार्केट यार्ड, अ. नगर
७५८८१११५५७/ ९८२२०८१४४०

ग्रामपंचायत आधी बु:ता:संगमनेर जि.अहिल्यानगर

जाहीर खुली निविदा सुचना क्रमांक २०२६-२७

ग्रामपंचायत कार्यालय आधी बु., ता. संगमनेर जि: अहिल्यानगर यांजकडुन जि.पं. नोंदणीकृत वर्ग ५ अ त्यावरील वर्गातील मक्तेदाराकडुन लिफाफा पद्धतीने खालील कामांच्यानिविदा मागविणेत येत आहे. निविदा कोरा नमुना संच वाटप व भरलेली निविदा स्विकारण्याचा कालावधी दि. २०/११/२०२६ सकाळी ९.०० वाजलेपासुन ते २७/११/२०२६ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यत ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध राहील.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	कामाची रक्कम	बयाणा रक्कम	निविदा फी	वर्ग	लेख शीर्ष	कालावधी
१	मौजे आधी बु:,ता:संगमनेर येथे गावांतर्गत आर.सी.सी. गटार करणे	रु.१९९९९९/-	रु.१६९४९१/-	१%	रु.२३६/-	खुला	पंचायत समिती सेस फंड २०२६-२७	३ महिने

१) उपरोक्त कामाबाबत निविदा अटी व शर्ती इ. बाबत सर्व तपशील कोऱ्या निविदा संचासोबत नमुद केलेला असुन निविदा संच दि. दि. २०/११/२०२६ सकाळी ९.०० वाजलेपासुन ते २७/११/२०२६ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यत ग्रामपंचायत कार्यालय आधी बुद्रुक, ता. संगमनेर येथे उपलब्ध आहे. ३) निविदा शक्य झाल्यास दि. ३०/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील.३) जाहीर निविदा अटी व शर्ती मध्ये बदल करणे, प्राप्त निविदापैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा तसेच कामाबाबत काही आकस्ति निर्णय घेण्याचा हक्क निम्न स्वाक्षरीत राखुन ठेवलेला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रा.पं.आधी बु।, ता. संगमनेर, जि. अ.नगर

सरपंच
ग्रा.पं.आधी बु।, ता. संगमनेर, जि. अ.नगर

२५ वे मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबीर डिसेंबरमध्ये

समाचार/नगर-दि.२०

भारतीय जैन संघटना (अहिल्यानगर), चांदमल मुनोत (नेवासकर) पब्लिक ट्रस्ट आणि जिल्हा शासकीय रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. पद्मश्री डॉ. शरदकुमार दिक्षित (अमेरिका) यांच्या स्मरणार्थ २५ वे मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबिर, दि. ९, १० व ११ डिसेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आले आहे.



स्व. डॉ. शरदकुमार दीक्षित



स्व. श्री. चांदमलजी मुनोत

सिव्हिल हॉस्पिटल, आयुष रुग्णालय येथे होणाऱ्या या शिबिरात डॉ. राज लाला (अमेरिका) आणि त्यांची टीम सुमारे १५० रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करणार असल्याची माहिती चांदमल मुनोत ट्रस्टचे ट्रस्टी किशोर मुनोत व भारतीय जैन संघटनेचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य आदेश चंगेडिया यांनी दिली.

गेल्या २५ वर्षांपासून या उपक्रमातून हजारो रुग्णांनी मोठा लाभ घेतला आहे. प्लॅस्टिक सर्जरी ही खर्चिक असल्याने अहिल्यानगरसह शेजारील जिल्ह्यांतील अनेक गरजू रुग्ण या शिबिराचा लाभ घेतात. स्व. डॉ. शरदकुमार दिक्षित यांच्या स्मरणार्थ त्यांचे शिष्य डॉ. राज लाला व ललिता लाला हे दरवर्षी अमेरिकेतून नगरला येऊन या उपक्रमात सहभाग घेतात. डॉ उज्वल भावसार (सूरत) तसेच डॉ. नूतन फिरोदिया, डॉ. दीपा भळगट, डॉ. मृदुला मुळे यांचेही या शिबिरासाठी मोलाचे योगदान असणार आहे. शिबिर प्रमुख म्हणून प्रशांत गांधी, शशिकांत मुनोत व अरुण दुगड काम पाहत आहेत.

शिबिरात प्रामुख्याने दुभंगलेले ओठ, चेहऱ्यावरील विद्रूप वर्ण/डाग, नाक व कानावरील बाह्य व्यंग, पापण्यांतील विकृती अशा महागड्या व सामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेरील शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहेत.


शिबिराची नोंदणी व प्राथमिक तपासणी फक्त बुधवार, दिनांक ९ डिसेंबर रोजी सकाळी ९.०० ते १.०० या वेळेतच होईल. यानंतर उर्वरित वेळेत शस्त्रक्रिया पार पडतील. जळालेले, भाजलेले किंवा पांढऱ्या डागांचे रुग्ण या शिबिरात सहभागी होऊ शकणार नाहीत. डिसेंबर २०२६ मध्ये डॉ. राज लाला रत्नागिरी (ओपीडी), पालघर, छ संभाजीनगर येथेही मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबिरे आयोजित होत आहेत. अधिक माहितीसाठी संपर्क : आदेश चंगेडिया - ९०१११५५५९९, प्रशांत गांधी - ८००७०७४०००, शशिकांत मुनोत - ९४२०४७७०५२, अरुण दुगड - ९८२२०२७३७३.

Milk & Cream Icecream Product
HATSUN Daily
Arun® ICECREAMS

प्रोप्रा : किशोर मुदगल डी-१२, एमआयडीसी अहमदनगर 7219515144

स्व. अरुणकाका जगताप क्रीडानगरीचे भूमिपूजन

२८ नोव्हेंबरपासून राज्यस्तरीय खो-खो अजिंक्यपद स्पर्धेचा थरार



समाचार/नगर-दि.२०

महाराष्ट्र राज्य खो-खो संघटनेच्या मान्यतेने आणि अहमदनगर जिल्हा खो-खो असोसिएशनच्या मार्गदर्शनाखाली एकलव्य क्रीडा मंडळ, निर्मलनगर यांच्या वतीने ६२ वी पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे. दि. २८ नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०२६ या कालावधीत न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या मैदानावर ही स्पर्धा रंगणार आहे. या स्पर्धेसाठी उभारण्यात येणाऱ्या माजी आमदार स्वर्गीय अरुणकाका जगताप क्रीडानगरी मैदानाचे भूमिपूजन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, नगरसेवक निखिल वारे, निर्मलचंद्र थोरात, प्राध्यापक सुनील जाधव, ज्ञानेश्वर काळे, प्राचार्य बाळासाहेब सागडे, नगरसेवक महेश लोंढे, अभिजित बोरुडे, सुधाकर सुंबे, बाळासाहेब पवार यांच्यासह खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, नगर जिल्हा हा क्रीडाप्रेमी जिल्हा असून, विविध क्रीडा प्रकारांतून चांगले खेळाडू घडत आहेत. या खेळाडूंचा आदर्श इतरांनीही घ्यावा, यासाठी राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचे आयोजन होणे गरजेचे आहे. स्पर्धांच्या माध्यमातून खेळाडू खऱ्या अर्थाने घडत असतात. मैदानावर खेळण्यासाठी येणाऱ्या खेळाडूंमध्ये ऊर्जा आणि प्रेरणा निर्माण होते. त्यातून खेळाविषयी आवड निर्माण होऊन नव्या खेळाडूंना प्रोत्साहन मिळते.

निर्मलचंद्र थोरात, नगरसेवक निखील वारे यांनीही मनोगत व्यक्त केले. स्पर्धेतील सामन्यांचे आकाशवाणी, यूट्यूब, फेसबुक, इन्स्टाग्राम तसेच अन्य सोशल मीडिया माध्यमांद्वारे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रत्यक्ष मैदानावर उपस्थित राहू न शकणाऱ्या क्रीडाप्रेमींनाही सामन्यांचा आनंद घेता येणार आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी न्यू आर्ट्स महाविद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब सागडे यांनी राज्यस्तरीय खो-खो स्पर्धे स शुभेच्छा दिल्या. भूमिपूजन कार्यक्रमाला क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी आणि खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.





